# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ५२ व्या सभेचा कार्यवृत्तांत
## बुधवार, दि.२६ जून, २०१३ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ५२ वी सभा बुधवार, दि.२६ जून, २०१३ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. तथा प्रभारी कुलसचिव | सदस्य तथा सचिव |
| ४) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ६) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ७) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ८) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ९) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| १०) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| ११) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १२) | डॉ. साळुंखे डी. जे., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १३) | श्री. रोकडे एम. एस. प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |

**अनुपस्थिती:**

प्रा. डॉ. पाटील टी. आर. व सौ. पद्मजादेवी मोहिते-पाटील यांनी दूरध्वनीद्वारे व्यवस्थापन परिषदेच्या या सभेस अनुपस्थित राहणार असल्याचे कळविले. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

**दोष - दुरुस्ती :**

१) विषय क्र. १३ दुरुस्त विषय देण्यात आला आहे.

२) पान क्र. २० वर, विषय क्र. २० च्या टिपणीमध्ये शेवटून दुसऱ्या परिच्छेदामध्ये २०% ऐवजी १०% अशी दुरुस्ती करण्यात आली आहे.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ] दि.०९ मे, २०१३ रोजीच्या एक्कावणाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव : दि.०९ मे, २०१३ रोजीच्या एक्कावणाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यपूर्ती अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

**(सभेवेळी देण्यात येईल)**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठरावः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी मंजूर असलेल्या अध्यादेशात (Ordinance) दुरुस्ती करुन सुधारीत केलेले अध्यादेश विद्यापरिषदेने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखा दि.२६/०३/२०१३ रोजीच्या बैठकीत आयत्या वेळचा ठराव क्र.१८(३) नुसार अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी मंजूर असलेल्या अध्यादेशात (Ordinance) दुरुस्ती करुन, सुधारीत केलेले अध्यादेश विद्यापरिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

विद्यापरिषदेच्या दि.२०/०४/२०१३ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.१६४ नुसार खालीलप्रमाणे ठराव पारीत झालेला आहे.

| |
|---|
| अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी मंजूर असलेल्या अध्यादेशात (Ordinance) किरकोळ दुरुस्ती करुन, सुधारीत केलेले अध्यादेश विद्यापरिषदेने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली. |

उक्त ठरावानुसार सदरचे सुधारीत केलेले अध्यादेश विद्यापरिषदेने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेले आहे.

सबब, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी मंजूर असलेल्या अध्यादेशात (Ordinance) दुरुस्ती करुन, सुधारीत केलेले अध्यादेश शै. वर्ष २०१३-१४ पासून अंमलबजावणी करावयाचे असल्याने, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८(ग) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव:** **अ) अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी दुरुस्ती करुन सुधारीत केलेल्या (Ordinance) अध्यादेशाबाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**ब) विषय व टिपणीतील "किरकोळ" हा शब्द वगळण्यात यावा.**

**[ ०४ ] अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखांतर्गत B.Pharm या कोर्सच्या अध्यादेश (Ordinance) मधील Award of the Degree and Class मध्ये दुरुस्ती करुन, सुधारीत केलेले अध्यादेश विद्यापरिषदेने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: फार्मसी अस्थाई अभ्यासमंडळाच्या दि.१३/०२/२०१३ रोजीच्या आयत्या वेळच्या बैठकीत ठराव क्र.४१ (१) नुसार B.Pharm या कोर्सच्या अध्यादेश (Ordinance) मधील Award of the Degree and Class मध्ये दुरुस्ती करुन, सुधारीत केलेले अध्यादेश अस्थाई अभ्यासमंडळाने स्वीकारुन, विद्याशाखेकडे शिफारस केलेले आहेत.

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखा दि.२६/०३/२०१३ रोजीच्या बैठकीत आयत्या वेळचा ठराव क्र.१८ (९) नुसार सदरचे अध्यादेश स्वीकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

विद्यापरिषदेच्या दि.२०/०४/२०१३ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.१६५ नुसार खालीलप्रमाणे ठराव पारीत झालेला आहे.

| |
|---|
| अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखांतर्गत B.Pharm या कोर्सच्या अध्यादेश (Ordinance) मधील Award of the degree and Class मध्ये दुरस्ती करुन, सुधारीत केलेले अध्यादेश विद्यापरिषदेने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली. |

उक्त ठरावानुसार सदरचे सुधारीत केलेले अध्यादेश विद्यापरिषदेने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.

सबब, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखांतर्गत B.Pharm या कोर्सच्या अध्यादेश (Ordinance) मधील Award of the Degree and Class मध्ये दुरुस्ती करुन, सुधारीत केलेले अध्यादेश शै. वर्ष २०१३-१४ पासून अंमलबजावणी करावयाचे असल्याने, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८(ग) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखांतर्गत B.Pharm या कोर्सच्या अध्यादेश (Ordinance) मधील Award of the Degree and Class मध्ये दुरुस्ती करुन, सुधारीत केलेल्या अध्यादेशाबाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ ०५ ] विज्ञान विद्याशाखांतर्गत B.Sc. या पदवी कोर्सचे सुधारीत केलेले अध्यादेश (Ordinance No.०४) विद्यापरिषदेने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी:दि.२६/०३/२०१३ रोजीच्या परीक्षा विभागाकडील मान्य टिपणी नुसार B.Sc. या कोर्सच्या अध्यादेशामध्ये (Ordinance No.०४) दुरुस्ती करुन, सुधारीत केलेले अध्यादेश विद्यापरिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

विद्यापरिषदेच्या दि.२०/०४/२०१३ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.१२४ नुसार खालीलप्रमाणे ठराव पारीत झालेला आहे.

| |
|---|
| विज्ञान विद्याशाखांतर्गत B.Sc. या कोर्सच्या अध्यादेशामध्ये (Ordinance No.०४) किरकोळ दुरुस्ती करुन, सुधारीत केलेले अध्यादेश विद्यापरिषदेने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली. |

सदरचे सुधारीत केलेले अध्यादेश विद्यापरिषदेने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेले आहे.

सबब, विज्ञान विद्याशाखांतर्गत B.Sc. या पदवी कोर्सचे सुधारीत केलेले अध्यादेश (Ordinance No.०४) शै. वर्ष २०१३-१४ पासून अंमलबजावणी करावयाचे असल्याने, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (ग) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव:** **अ) विज्ञान विद्याशाखांतर्गत B.Sc. या पदवी कोर्सच्या (Ordinance No.०४) अध्यादेशामध्ये दुरुस्ती करुन सुधारीत केलेल्या अध्यादेशाबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**ब) विषयाच्या टिपणीतील "किरकोळ" हा शब्द वगळण्यात यावा.**

**[ ०६ ] वाणिज्य विद्याशाखांतर्गत B.Com या पदवी कोर्सचे सुधारीत केलेले अध्यादेश (Ordinance No.१३) विद्यापरिषदेने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: मा. अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा यांनी दि.१६/०३/२०१३ रोजीच्या पत्रान्वये, B.Com या कोर्सच्या अध्यादेशामध्ये (Ordinance No.१३) दुरुस्ती करुन, सुधारीत केलेले अध्यादेश विद्याशाखेच्यावतीने स्वीकारुन, विद्यापरिषदेकडे शिफारस केलेले आहेत.

विद्यापरिषदेच्या दि.२०/०४/२०१३ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.१३१ नुसार खालीलप्रमाणे ठराव पारीत झालेला आहे.

| |
|---|
| वाणिज्य विद्याशाखांतर्गत B.Com या कोर्सच्या अध्यादेशामध्ये (Ordinance No.१३) किरकोळ दुरुस्ती करुन, सुधारीत केलेले अध्यादेश विद्यापरिषदेने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली. |

सदरचे सुधारीत केलेले अध्यादेश विद्यापरिषदेने स्वीकारुन, व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.

सबब, वाणिज्य विद्याशाखांतर्गत B.Com या पदवी कोर्सचे सुधारीत केलेले अध्यादेश (Ordinance No.१३) शै. वर्ष २०१३-१४ पासून अंमलबजावणी करावयाचे असल्याने, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८(ग) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: वाणिज्य विद्याशाखांतर्गत B.Com. या पदवी कोर्सच्या (Ordinance No.१३) अध्यादेशामध्ये दुरुस्ती करुन सुधारीत केलेल्या अध्यादेशाबाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ ०७ ] विद्यापीठात सुरु असलेला एम. ए. शिक्षणशास्त्र हा अभ्यासक्रम शै. वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात एम. ए. एज्युकेशन हा अभ्यासक्रम / कोर्स सुरु करण्यासाठी विद्यापरिषदेने ठराव क्र.५१ दि.१४/१२/२००७ अन्वये महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ३० (२) (इ) नुसार व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली होती. त्यास अनुसरुन विद्या परिषदेची शिफारस व्यवस्थापन परिषदेसमोर सादर केली असता व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र.७ दि.२७/१२/२००७ अन्वये खालीलप्रमाणे ठराव पारित केलेला होता.

**अ.क्र.१ ते ४ बाबत विद्या परिषदेने म. वि. कायदा १९९४ कलम ३० (२) (इ) नुसार केलेल्या शिफारशींची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

उपरोक्त ठरावास अनुसरुन शै. वर्ष २००९-१० पासून प्रस्तुत विद्यापीठात दोन वर्षाचा एम. ए. शिक्षणशास्त्र हा अभ्यासक्रम Self Supporting Basis वर शिक्षणशास्त्र संकुलामार्फत चालविले जातो. तथापि, मा. संचालक, शिक्षणशास्त्र संकुल यांनी एम. ए. शिक्षणशास्त्र या कोर्सला यंदा एकाही विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला नाही. तसेच भविष्यातही या कोर्सला प्रवेश घेणे कठीण दिसते, म्हणून हा अभ्यासक्रम बंद करावा असे मत कळविले होते यावर विचार करुन निर्णय घेण्यात यावा असे पत्राद्वारे विनंती केलेली होती. सदर पत्र दि.२०/०४/२०१३ रोजीच्या विद्या परिषदेसमोर विचारार्थ सादर केला असता विद्या परिषदेने ठराव क्र.७० अन्वये एम. ए. एज्युकेशन हा अभ्यासक्रम शै. वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस केलेली आहे.

सबब, विद्यापीठात सुरु असलेला एम. ए. शिक्षणशास्त्र हा अभ्यासक्रम शै. वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने कलेली शिफारस विचारार्थ).

ठराव: **विद्यापीठात सुरु असलेला एम. ए. शिक्षणशास्त्र हा अभ्यासक्रम शै. वर्ष २०१३-१४ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ ०८ ]** **सोलापूर विद्यापीठामध्ये बी. ए. भाग-३ राज्यशास्त्र या विषयाच्या परिक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास सुवर्णपदक देण्याकरिता डॉ. श्रीकांत दतात्रय येळेगांवकर यांनी रु. १,००,०००/- देणगी दाखल सादर केलेल्या पत्राबाबत व सुवर्णपदक नियमावलीमध्ये सदरची बाब समाविष्ट करण्याबाबत विचारार्थ.**

(टिपणी: दि. १० जून, २०१३ रोजीच्या पत्रान्वये, डॉ. श्रीकांत दतात्रय येळेगांवकर, सोलापूर यांनी सोलापूर विद्यापीठात राज्यशास्त्र बी.ए. भाग-३ मध्ये अभ्यासक्रमांत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातून प्रथम क्रमांक प्राप्त करणा-या स्नातकास सुवर्णपदक देण्याचा मानस असून हे सुवर्णपदक **"डॉ. श्रीकांत दतात्रय येळेगांवकर सुवर्ण पदक"** या नावाने विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभावेळी स्नातकास प्रदान करण्यात यावे. याकरिता डॉ. श्रीकांत दतात्रय येळेगांवकर
हे रु.१,००,०००/- ( अक्षरी एक लाख रु. फक्त) देणगीदाखल देवू इच्छितात. सदर रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी सदरचे सुवर्णपदक पुढील वर्षापासून देण्यात यावे. तसेच सदर सुवर्णपदकासाठी विद्यापीठाने योग्य ती नियमावली करण्यास त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे नमूद केलेले आहे.

डॉ. श्रीकांत येळेगांवकर यांनी देवू केलेली देणगी स्विकारण्याची बाब महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (ज) नुसार विचारार्थ).

**ठराव:** **सोलापूर विद्यापीठामध्ये विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातून बी. ए. भाग-३ राज्यशास्त्र या विषयाच्या परिक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या स्नातकास सुवर्णपदक देण्याकरिता डॉ. श्रीकांत दतात्रय येळेगांवकर यांनी देवू केलेली रु.१,००,०००/- देणगी स्विकारण्यात येवून सुवर्णपदक नियमावलीमध्ये सदरची बाब समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] सोलापूर विद्यापीठामध्ये B.Com (Hons) या विषयाच्या परिक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास सुवर्णपदक देण्याकरिता इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाऊंट ऑफ इंडिया यांच्यावतीने डायरेक्टर बोर्ड ऑफ स्टडीज् श्री. विजय कपूर यांनी रु.१,००,०००/- देणगी दाखल सादर केलेल्या पत्राबाबत व सुवर्णपदक नियमावलीमध्ये सदरची बाब समाविष्ट करण्याबाबत विचारार्थ.**

(टिपणी: दि. १५ एप्रिल, २०१३ रोजीच्या पत्रान्वये, श्री. विजय कपूर, संचालक, अभ्यासमंडळे, इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंट ऑफ इंडिया, ICAI भवन A-२९ इंडिया, यु. पी. यांनी **B.Com (Hons)** अभ्यासक्रमांत विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातून प्रथम क्रमांक प्राप्त करणा-या स्नातकास सुवर्णपदक देण्याचा मानस असून हे सुवर्णपदक **"The Institute of Chartered Accountants of India Gold Medal"** या नावाने विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभावेळी स्नातकास प्रदान करण्यात यावे. याकरिता इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाऊंट ऑफ इंडिया यांच्यावतीने डायरेक्टर बोर्ड ऑफ स्टडीज् श्री. विजय कपूर हे रु.१,००,०००/- (अक्षरी एक लाख रु. फक्त) देणगीदाखल देवू इच्छितात. सदर रकमेच्या व्याजातून प्रतिवर्षी सदरचे सुवर्णपदक पुढील वर्षापासून देण्यात यावे. तसेच सदर सुवर्णपदकासाठी विद्यापीठाने योग्य ती नियमावली करण्यास त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे नमूद केलेले आहे.

इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाऊंट ऑफ इंडिया यांच्यावतीने डायरेक्टर बोर्ड ऑफ स्टडीज्, श्री. विजय कपूर यांनी देवू केलेली देणगी स्विकारण्याची बाब महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (ज) नुसार विचारार्थ).

**ठराव: सोलापूर विद्यापीठामध्ये विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातून B.Com. या परिक्षेत गुणानुक्रमे प्रथम येणा-या स्नातकास सुवर्णपदक देण्याकरिता इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाऊंट ऑफ इंडिया यांच्यावतीने डायरेक्टर बोर्ड ऑफ स्टडीज् श्री. विजय कपूर यांनी देवू केलेली रु.१,००,०००/- देणगी स्विकारण्यात येवून सुवर्णपदक नियमावलीमध्ये सदरची बाब समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १० ] राज्य शासनाने गठीत केलेल्या परीक्षा सुधार समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार परीक्षा कार्यप्रणाली पार पाडण्यासाठी दर्जेदार सेवा पुरविणाऱ्या संस्थेकडून सेवा उपलब्ध करुन घेण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी:- राज्यातील सर्व विद्यापीठांकडून घेण्यात येत असलेल्या परीक्षांच्या पेपरफुटीवर सर्वकष अभ्यास करुन विविध उपाययोजना करण्यासाठी राज्य शासनाने उच्चस्तर समिती स्थापन केली होती. सदरच्या समितीने अनेक बैठका वेगवेगळ्या विद्यापीठात घेऊन परीक्षा कार्यप्रणालीबाबत काही उपाययोजना सुचविल्या आहेत. त्यातील एक उपाय योजना म्हणजे राज्यात ज्या काही दर्जेदार सेवा पुरविणा-या संस्था आहेत, अशा दर्जेदार सेवा पुरविणाऱ्या संस्थेकडून सेवा उपलब्ध करुन घेऊन परीक्षा कार्यप्रणाली पार पाडावी, अशी तरतुद उच्चस्तर समितीच्या अहवालात नमुद करण्यात आली आहे.

दर्जेदार सेवा पुरविणाऱ्या संस्थेकडून परीक्षा कार्यप्रणाली पार पाडण्यासाठी सेवा उपलब्ध करुन घेण्याची बाब दिनांक ५/०२/२०१३ रोजी झालेल्या परीक्षा सुधार समितीच्या विचारार्थ विषय क्र-२ अन्वये ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

| | |
|---|---|
| ठराव | राज्य शासनाने गठीत केलेल्या परीक्षा सुधार समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार विद्यापीठाला परीक्षा प्रक्रियासाठी काही खाजगी सेवा पुरवणा-या संस्थाकडून सेवा पुरवून घेऊन सदरील ऑन लाईन परीक्षा पध्दती ही (B.Sc-I & First Year Engg.) विज्ञान विद्याशाखा व अभियांत्रिकी प्रथम वर्ष यांना २०१३-१४ या वर्षापासून प्रायोगिक तत्वावर स्वीकारण्याची शिफारस सर्वानुमते करावी असे ठरले. |

परीक्षा सुधार समितीची शिफारस विषय क्र-७ अन्वये दिनांक-१६/०२/२०१३ रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या माहितीसाठी व विचारार्थ ठेवण्यात आली होती. परीक्षा सुधार समितीच्या ठरावानुसार सदरची कार्यप्रणाली स्विकृत करण्याची शिफारस परीक्षा मंडळाने विद्यापरिषदेस केली होती. त्यानुसार सदरची शिफारस दि.२० एप्रिल, २०१३ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेमध्ये विषय क्र.१७३ अन्वये विचारार्थ ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

| | |
|---|---|
| ठराव | राज्य शासनाने गठीत केलेल्या परीक्षा सुधार समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार विद्यापीठाला परीक्षा प्रक्रियासाठी काही खाजगी सेवा पुरवणा-या संस्थाकडून सेवा पुरवून घेऊन सदरील ऑन लाईन परीक्षा पध्दती ही (B.Sc-I & First Year Engg.) विज्ञान विद्याशाखा व अभियांत्रिकी प्रथम वर्ष यांना २०१३-१४ या वर्षापासून प्रायोगिक तत्वावर स्वीकारण्याची सेवा उपलब्ध करुन घेण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

विद्यापरिषदेची शिफारस विचारार्थ).

**ठराव: राज्य शासनाने गठीत केलेल्या परीक्षा सुधार समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार परीक्षा कार्यप्रणाली पार पाडण्यासाठी दर्जेदार सेवा पुरविणाऱ्या संस्थेकडून सेवा उपलब्ध करुन B.Sc. I & First Year Engg. प्रथम वर्षाच्या परीक्षा शै. वर्ष २०१३-१४ पासून online पध्दतीने प्रश्नपत्रिका वितरण व उत्तरपत्रिका मूल्यमापन करुन घेण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ ११ ] दि.२३/०५/२०१३ च्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत मान्यतेसाठी.**

(टिपणी: दि.२३/०५/२०१३ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No.S.324 नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार वित्त व लेखा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता, त्यास दि.३०/०५/२०१३ च्या वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

सबब, दि.२३/०५/२०१३ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: दि.२३/०५/२०१३ च्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांताबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ १२ ]** **विद्यापीठ वाहन क्रमांक एमएच १३ एसी ५३५ टाटा इंडिगो पेट्रोल या वाहनाची विक्री करणेबाबत.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठ कार्यालयाकडे संवैधानिक अधिकारी वर्गांना कार्यालयीन कामाच्या वापराकरीता सद्यस्थितीत एक टाटा इंडिका, एक टाटा इंडिगो सीएस (डिझेल), एक टोयोटा इंटिऑस व एक टाटा इंडिगो (पेट्रोल) ही वाहने आहेत.

विद्यापीठ कार्यालयाकडे सद्यस्थितीत असलेले वाहन क्र.एमचएच १३ एसी ५३५ टाटा इंडिगो (पेट्रोल) हे वाहन २००६ साली खरेदी करण्यात आले असून वाहनाचे **कि.मी. १४५३९०** इतके झालेले आहे. सदरचे वाहन हे पेट्रोल या इंधनाचे असून वाहनाचे वारंवार दुरुस्ती कामे निघत असल्याने, वाहन खर्चिक होत असून वाहन विक्री करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव:** **विद्यापीठ वाहन क्रमांक एमएच १३ एसी ५३५ टाटा इंडिगो पेट्रोल या वाहनाची विक्री करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.**

**[ १३ ] सोलापूर विद्यापीठाच्या वापराकरीता Toyota Fortuner वाहन खरेदी करण्याबाबत तसेच टाटा इंडिगो या वाहनाची विक्री केल्यानंतर त्याच्या बदल्यात एक नवीन वाहन खरेदी करण्याबाबत.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठ कार्यालयाकडे वापराकरीता सद्यस्थितीत हुंडाई वेरणा हे वाहन असून दि.२१/१०/२००८ रोजी खरेदी करण्यात आलेले आहे. वाहनाचे सद्यस्थितीत दि.३१/५/२०१३ अखेर **कि.मी १८०२८२** इतके झालेले आहे.

कार्यालयीन कामाकरीता पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणी वारंवार जाण्याकरीता विद्यापीठ वाहनाचा वापर करावा लागतो. सद्यस्थितीत असलेल्या वाहनाचे कि.मी.१५०००० पेक्षा जास्त झाले असून वाहनाचा पिक अप (वेग क्षमता) कमी झाला आहे. वाहनाची बैठक उंची व वाहनाची उंची कमी असून सिट स्पेस देखील कमी असल्यामुळे लांबच्या प्रवासावेळी वाहनात सतत ७ /८ तास बसावे लागते. त्यामुळे सद्यस्थितीत असलेले वाहन वारंवार दूरच्या प्रवासासाठी वापरणे सोईचे व आरामदायी नाही. विद्यापीठ वापराकरीता दूरच्या प्रवासायोग्य वाहनाची बैठक व्यवस्था आरामदायी असणाऱ्या Toyota Fortuner या वाहनाची डॉ.बा.आं.म.वि., औरंगाबाद यांनी खरेदी केली असून याचा विचार करता सोलापूर विद्यापीठास Toyota Fortuner हे वाहन खरेदी करणे संयुक्तिक होईल असे सुचविले आहे. तरी सदर वाहन खरेदी करण्यास अंदाजे रु.२५ लक्ष अधिक टॅक्स, आर टी ओ फी, इन्शोरन्स चार्जेस व इतर इतका खर्च येणार आहे. तसेच टाटा इंडिगो एम. एच. १३ ए. सी. ५३५ हे वाहन विक्री केल्यानंतर कार्यालयीन कामकाजाकरिता त्याच्या बदल्यात एक नवीन वाहन खरेदी करणे आवश्यक आहे. याकरिता अंदाजे रु.१० लक्ष अधिक टॅक्स, आर टी ओ फी, इन्शोरन्स चार्जेस व इतर इतका खर्च येणार आहे. असा एकूण अंदाजे रु.४० लक्ष इतका दोन नवीन वाहन खरेदी करण्यास येणार आहे.

सबब, Toyota Fortuner हे नवीन वाहन खरेदी करण्यास व टाटा इंडिगो एम. एच. १३ ए. सी. ५३५ हे वाहन विक्री केल्यानंतर त्याच्या बदल्यात एक नवीन वाहन खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यतेस्तव विचारार्थ).

ठराव: **सोलापूर विद्यापीठाच्या कार्यालयीन कामकाजाकरिता ०२ नवीन वाहने खरेदी करण्यास व यासाठी अपेक्षित खर्च रु.४० लक्ष अधिक टॅक्स, आर. टी. ओ. Registration फीज्, इन्शोरन्स चार्जेस व इतर अनुषंगिक खर्च यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.**

**[ १४ ] विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह चालविण्यास देण्याबाबत.**

(टिपणीः विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह चालविणे या कामाची जाहीर निविदा सूचना दिनांक २४/०४/२०१३ रोजी दै. लोकमत मध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. त्यास अनुसरुन निविदा विद्यापीठ कार्यालयात पोहोच करण्याची अंतिम तारीख १५/०५/२०१३ ही होती. त्यानुसार सदर मुदतीत एकूण ६ निविदा प्राप्त झाल्या. त्यानंतर निविदाधारक व खरेदी समिती सदस्यांसमोर सदर कामाची तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असता प्राप्त सहा निविदापैकी दोनच निविदा तांत्रिक निविदेमध्ये पात्र झाल्याने सदर कामाची पहिली मुदतवाढीची सूचना दै.लोकमत मध्ये १६/०५/२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विद्यापीठ कार्यालयात पोहोच करण्याची अंतिम तारीख दि.२२/०५/२०१३ होती.

त्या अनुषंगाने सदर मुदतीत एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त झालेल्या निविदा, निविदाधारक व खरेदी समिती सदस्यांसमोर सदर कामाची तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असता प्राप्त ३ निविदांपैकी तीनही निविदा तांत्रिक निविदेमध्ये पात्र झाल्या. याप्रमाणे तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या पूर्वीच्या २ व सदरील ३ अशा एकूण ५ निविदाधारकांच्या आर्थिक निविदा उघडण्यात आल्या. सदरील निविदांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. सदरील निविदांमध्ये सर्वात कमी दर असलेले मे. हॉटेल शिवनेरी अँड मेस, सोलापूर यांना सदरील उपाहारगृह अकरा महिन्याच्या कालावधीसाठी चालविण्यास देण्याची समितीने शिफारस केलेली आहे.

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता देण्याचे अधिकार मा.कुलगुरुमहोदय यांना आहेत. उपाहारगृह दि.१ जून २०१३ पासून चालू करणे आवश्यक असल्यामुळे उपरोक्त तरतुदीनूसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह दिनांक १ जून २०१३ पासून चालू करण्यास मा.कुलगुरुमहोदयांनी मान्यता दिलेली आहे.

सबब मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठरावः मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ १५ ] विद्यापीठ परिसरातील मुलींचे वसतीगृह येथील मेस चालविणे या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस चालविणे या कामाची जाहीर निविदा सूचना दि.०३/०५/२०१३ रोजीच्या दै. दिव्य मराठी या दैनिकांमधून देण्यात येवून दिनांक २२/०५/२०१३ पर्यंत निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार अंतिम दिनांकापर्यंत विद्यापीठ कार्यालयास ६ निविदा प्राप्त झाल्या. निविदाधारक व खरेदी समिती सदस्यांसमोर सदर कामाचे तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असता प्राप्त निविदांपैकी ४ निविदाधारक तांत्रिक निविदेमध्ये पात्र झाले. सदरील प्राप्त झालेल्या ४ निविदाधारकांच्या आर्थिक निविदा उघडण्यात आल्या. सदरील निविदांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. त्यानुसार सर्वात कमी दर मे. हॉटेल शिवनेरी ॲड मेस, सोलापूर यांचे आहेत.

सबब, समितीच्या शिफारशीनुसार व सोबत जोडलेल्या तक्त्यातील दरानुसार विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस चालविण्याचे काम सर्वात कमी दर असलेले मे. हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर यांना अकरा महिन्याच्या कालावधीसाठी देण्याची बाब विचारार्थ).

**ठराव:**

**अ) सोबतच्या तौलनिक तक्त्यातील सर्वात कमी दर हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर यांचे असल्याने या फर्मला विद्यापीठ परिसरातील मुलींच्या वसतिगृहातील मेस अकरा महिन्याच्या कालावधीकरीता चालविण्यास देण्यास मान्यता देण्यात आली.**

**ब) सोबतच्या तौलनिक तक्त्यातील L1 यांनी असमर्थता दर्शविल्यास प्रशासकीय मान्यतेअंती नियमाप्रमाणे L2, L3, L4 यांना कार्यारंभ आदेश निर्गमित करावे असे ठरले.**

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

कामाचे नांव- विद्यापीठ परिसरातील मुलींचे वसतीगृह येथील मेस चालविणेबाबत. दि. २२/०५/२०१३

कामाचा कालावधी - ११ महिना

*विद्यापीठ परिसरातील मुलींचे वसतीगृह येथील मेस चालविणे या कामाचे दराचा तुलनात्मक तक्ता*

बयाणा रक्कम - रु.५,०००/-

| अ. क्र. | तपशिल | मे. हॉटेल शिवनेरी अॅन्ड मेस, सोलापूर | मे. मातोश्री सावित्रीबाई फुले बहुउद्येशीय सामाजिक संस्था, सोलापूर | मे. बालाजी केटरर्स, सोलापूर | मे. जय भवानी खानावळ, सोलापूर |
|---|---|---|---|---|---|
| | | निविदे मध्ये नमुद केलेले दर | निविदे मध्ये नमुद केलेले दर | निविदे मध्ये नमुद केलेले दर | निविदे मध्ये नमुद केलेले दर |
| १ | **दोन्ही वेळचे जेवण** (प्रति महिना) (अमर्यादित)<br>१.चपाती/भाकरी<br>२.सुकी भाजी<br>३.पातळ भाजी<br>४ वरण/आमटी<br>५.भात<br>६.शेंगा चटणी/लोणचे/पापड/कोशींबीर<br>७.दहीवाटी/ताक<br>८.कांदा,लिंबू<br>आठवडयातून एक दिवस मिष्ठान्न भोजन | रु.१०८०/- प्रति महिना - L-1 | रू.१८००/- प्रति महिना | रू.११४९/- प्रति महिना | रू.१२००/- प्रति महिना |
| २ | **एका वेळेचे वरील मेनूप्रमाणे जेवण** [प्रति महिना] (अमर्यादित) | रु.६००/- L-1 | रु.९००/- | -- | रु.६५०/- |
| ३ | **अल्होपाहार पदार्थ** | | | | |
| | १.शिरा/उपीट [१ प्लेट]१०० ग्रॅम | रु.५/- L-1 | रु.१०/- | रु.१०/- | रु.१३/- |
| | २. पोहे [१ प्लेट] १०० ग्रॅम | रु.५/- L-1 | रु.१०/- | रु.१०/ | रु.१३/ |
| | ३.वडा सांबर [२ नग] ४० ग्रॅम प्रति नग | रु.१०/- L-1 | रु.१०/- | रु.१८/ | रु.१५/ |
| | ४.इडली सांबर [२ नग] ३० ग्रॅम प्रति नग | रु.९/- L-1 | रु.१०/- | रु.२०/ | रु.१२/ |
| | ५.टोमॅटो ऑम्लेट [१ प्लेट] | रु.१०/- L-1 | रु.१०/- | रु.२०/ | रु.२५/ |
| | ६. चहा [साधा] ६५ मिली | रु.५/- L-1 | रु.५/- | रु.६/ | रु.५/ |
| | ७.चहा[स्पेशल] ६५ मिली | रु.६/- L-1 | रु.१०/- | रु.८/ | रु.८/ |
| | ८.नेस कॉफी -६५ मिली | रु.७/- L-1 | रु.१०/- | रु.१०/ | रु.८/ |
| | ९.दूध - १०० मिली | रु.६/- L-1 | रु.७/- | रु.१०/ | रु.८/ |
| | १०.समोसा/कचोरी/वडापाव[१ नग] [८० ग्रॅम प्रति नग] | रु.५/- L-1 | रु.१०/- | रु.८/ | रु.५/ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ११.मॅगी | रु.१०/- | L-1 | रु.१५/- | रु.१५/ | -- |
| | १२.शाबुदाना खिचडी १२५ ग्रॅम | रु.१०/- | L-1 | रु.१५/- | रु.१०/ | रु.१५/ |
| | १३.शाबुवडा [२ नग] ४० ग्रॅम प्रति नग | रु.१२/- | L-1 | रु.१६/- | रु.१२/ | रु.१५/ |
| | १४.मिसळ पाव | रु.१२/- | L-1 | रु.१५/- | रु.२०/ | रु.१३/ |
| | १५.कोल्ड्रींक्स | MRP | L-1 | रु.१५/- | कंपनी दर | रु.१७/ |
| | १६.पाणी बॉटल | MRP | L-1 | रु.१५/- | कंपनी दर | रु.१४/ |
| | १७.मिल्क शेक | रु.१५/- | L-1 | -- | रु.२०/ | -- |
| | १८.आईसक्रीम | MRP | L-1 | -- | कंपणी दर | -- |
| | १९.कोकम | रु.१०/- | L-1 | -- | रु.१०/ | -- |
| | **शेरा** | **शिफारस** | **L-1** | **L-4** | **L-2** | **L-3** |

**विद्यापीठ परिसरातील मुलींचे वसतिगृह येथील मेस चालविणेचे काम सर्वात कमी दराचे पुरवठाधारक मे. हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर यांना देण्याची शिफारस करण्यात येत आहे.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- |
| सदस्य | सदस्य | सदस्य | वित्त व लेखाधिकारी | प्र. कुलसचिव | मा.कुलगुरु सो |
| खरेदी समिती | खरेदी समिती | खरेदी समिती | | | |

**[ १६ ] विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृह येथील मेस क्र.१ चालविणे या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरातील मुलांच्या वसतिगृहातील मेस क्र.१ चालविणे या कामाची जाहीर निविदा सूचना दि.०३/०५/२०१३ रोजीच्या दै.दिव्य मराठी या दैनिकांमधून देण्यात येवून दिनांक २२/०५/२०१३ पर्यत निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार अंतिम दिनांकापर्यत विद्यापीठ कार्यालयास फक्त २ निविदा प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त निविदा उघडून पूढील कार्यवाही करण्यासाठी किमान ३ निविदा आवश्यक असल्यामुळे या बाबीसाठी ७ दिवसांची पहिली मुदतवाढ देण्यात आली होती व याबाबतची जाहीर सूचना दि.२३/०५/२०१३ च्या दैनिक दिव्य मराठी या दैनिकामधून देण्यात येवून दिनांक ३०/०५/२०१३ पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. याप्रमाणे मुदतवाढीच्या कालावधीत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या एकूण ५ निविदा (२+३) दिनांक ३०/०५/२०१३ रोजी निविदाधारक व खरेदी समिती सदस्यांसमोर तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असता, प्राप्त निविदांपैकी ३ निविदाधारक तांत्रिक निविदेमध्ये पात्र झाले. सदरील पात्र झालेल्या ३ निविदाधारकांच्या आर्थिक निविदा उघडण्यात आल्या. सदरील निविदांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. त्यानुसार सर्वात कमी दर मातोश्री सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय संस्था, सोलापूर यांचे आहेत.

सबब, समितीच्या शिफारशीनुसार व सोबत जोडलेल्या तक्त्यातील दरानुसार विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृहातील मेस क्र. १ चालविण्याचे काम सर्वात कमी दर असलेले मातोश्री सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय संस्था, सोलापूर यांना अकरा महिन्याच्या कालावधीसाठी देण्याची बाब विचारार्थ).

**ठराव:** अ) **सोबतच्या तौलनिक तक्त्यातील सर्वात कमी दर मातोश्री सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय संस्था, सोलापूर यांचे असल्याने या फर्मला विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृहातील मेस क्र. १ अकरा महिन्याच्या कालावधीकरीता चालविण्यास देण्यास मान्यता देण्यात आली.**

ब) **सोबतच्या तौलनिक तक्त्यातील L1 यांनी असमर्थता दर्शविल्यास प्रशासकीय मान्यतेअंती नियमाप्रमाणे L2, L3 यांना कार्यारंभ आदेश निर्गमित करावे असे ठरले.**

कुलसचिव कार्यालयँ
जा. क्र. 404
दि. 12/06/2013

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

कामाचे नांव- मुलांचे वसतीगृह येथील मेस क्र.१ चालविणे
कामाचा कालावधी - ११ महिने
बयाणा रक्कम - रु.५,०००/-

दि. 30/05/2013

दराचा तुलनात्मक तक्ता

| अ. क्र. | तपशिल | श्री गोकर्ण मागासवर्गीय महिला बहुउद्येशीय संस्था, सोलापूर | मातोश्री सावित्रिबाई फुले बहुउद्येशीय सामाजिक संस्था, सोलापूर | श्री स्वामी समर्थ केटरर्स, सोलापूर |
|---|---|---|---|---|
| | | निविदे मध्ये नमुद केलेले दर | निविदे मध्ये नमुद केलेले दर | निविदे मध्ये नमुद केलेले दर |
| १ | **दोन्ही वेळचे जेवण** (प्रति महिना) (अमर्यादित)<br>१.चपाती/भाकरी<br>२.सुकी भाजी<br>३.पातळ भाजी<br>४ वरण/आमटी<br>५.भात<br>६.शेंगा चटणी/लोणचे/पापड/कोशींबीर<br>७.दहीवाटी/ताक<br>८.कांदा,लिंबू<br>आठवडयातून एक दिवस मिष्ठान्न भोजन | रु.१८००/- | रु.१०११/- L-1 | रु.१४५०/- |
| २ | **एका वेळेचे वरील मेनूप्रमाणे जेवण** [प्रति महिना] (अमर्यादित) | रु.९००/- | रु.५०५/- L-1 | रु.७२५/- |
| ३ | **अल्होपाहार पदार्थ** | | | |
| | १.शिरा/उपीट [१ प्लेट]१०० ग्रॅम | रु.१०/- | रु.६/- L-1 | रु.१५/- |
| | २. पोहे [१ प्लेट] १०० ग्रॅम | रु.१०/- | रु.६/- L-1 | रु.१५/- |
| | ३.वडा सांबर [२ नग] ४० ग्रॅम प्रति नग | रु.१०/- | रु.१०/- L-1 | रु.२०/- |
| | ४.इडली सांबर [२ नग] ३० ग्रॅम प्रति नग | रु.१०/- | रु.१०/- L-1 | रु.२०/- |
| | ५.टोमॅटो ऑम्लेट [१ प्लेट] | रु.१०/- | रु.८/- L-1 | रु.१५/- |
| | ६. चहा [साधा] ६५ मिली | रु.५/- | रु.५/- L-1 | रु.१०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ७.चहा[स्पेशल] ६५ मिली | रु.१०/- | रु.८/- L-1 | रु.१२/- |
| | ८.नेस कॉफी -६५ मिली | रु.१०/- | रु.१०/- L-1 | रु.१२/- |
| | ९.दूध - १०० मिली | रु.८/- | रु.८/- L-1 | रु.१२/- |
| | १०.समोसा/कचोरी/वडापाव[१ नग] [८० ग्रॅम प्रति नग] | रु.१०/- | रु.१०/- L-1 | रु.१०/- |
| | ११.मॅगी | रु.१५/- | रु.१५/- L-1 | रु.१५/- |
| | १२.शाबुदाना खिचडी १२५ ग्रॅम | रु.१५/- | रु.१५/- L-1 | रु.२०/- |
| | १३.शाबुवडा [२ नग] ४० ग्रॅम प्रति नग | रु.१६/- | रु.२०/- L-1 2 | रु.२०/- |
| | १४.मिसळ पाव | रु.१५/- | रु.१५/- L-1 | रु.२०/- |
| | १५.कोल्ड्रींक्स | रु.१५/- | M.R.P.प्रमाणे L-1 | रु.१५/- |
| | १६.पाणी बॉटल | रु.१५/- | M.R.P.प्रमाणे L-1 | रु.१५/- |
| | १७.मिल्क शेक | -- | M.R.P.प्रमाणे L-1 | रु.२०/- |
| | १८.आईसक्रीम | -- | M.R.P.प्रमाणे L-1 | रु.२०/- |
| | १९.कोकम | -- | M.R.P.प्रमाणे L-1 | रु.१५/- |
| | **शेरा** | **L-3** | **L-1** शिफारस | **L-2** |

**विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृह येथील मेस क्र.१ चालविणेचे काम सर्वात कमी दराचे पुरवठाधारक मातोश्री सावित्रिबाई फुले बहुउद्येशीय सामाजिक संस्था, सोलापूर यांना देण्याची शिफारस करण्यात येत आहे.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सदस्य<br>खरेदी समिती | सदस्य<br>खरेदी समिती | सदस्य<br>खरेदी समिती | वित्त व लेखाधिकारी | प्र. कुलसचिव<br>11/6/13 | मा.कुलगुरु सो<br>11.6.13 |

**[ १७ ] विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृह येथील मेस क्र. २ चालविणे या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरातील मुलांच्या वसतिगृहातील मेस क्र.२ चालविणे या कामाची जाहीर निविदा सूचना दि.०३/०५/२०१३ रोजीच्या दै.दिव्य मराठी या दैनिकांमधून देण्यात येवून दिनांक २२/०५/२०१३ पर्यत निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार अंतिम दिनांकापर्यत विद्यापीठ कार्यालयास फक्त २ निविदा प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त निविदा उघडून पुढील कार्यवाही करणेसाठी किमान ३ निविदा आवश्यक असल्यामुळे या बाबीसाठी ७ दिवसांची पहिली मुदतवाढ देण्यात आली होती व याबाबतची जाहीर निविदा सूचना दि.२३/०५/२०१३ च्या दैनिक दिव्य मराठी या दैनिकामधून देण्यात येवून दिनांक ३०/०५/२०१३ पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. याप्रमाणे मुदतवाढीच्या कालावधीत २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या एकूण ४ निविदा (२+२) दिनांक ३०/०५/२०१३ रोजी निविदाधारक व खरेदीसमिती सदस्यांसमोर तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असता प्राप्त निविदांपैकी फक्त १ निविदाधारक तांत्रिक निविदेमध्ये पात्र झाले. यामुळे सदरील कामासाठी दुसरी मुदतवाढ देण्यात येवून दि.३१/०५/२०१३ च्या दैनिक दिव्य मराठी या दैनिकामधून जाहीर निविदा सूचना देण्यात येवून दिनांक ०७/०६/२०१३ पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. याप्रमाणे मुदतवाढीच्या कालावधीत ४ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या ४ निविदा दिनांक ११/०६/२०१३ रोजी निविदाधारक व खरेदीसमिती सदस्यांसमोर तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असता २ निविदाधारक तांत्रिक निविदेमध्ये पात्र झाले. या प्रमाणे तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या एकूण ३ निविदाधारकांच्या आर्थिक निविदा उघडण्यात आल्या. सदरील निविदांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. त्यानुसार सर्वात कमी दर मे. गोकर्ण मागासवर्गीय महिला बहुउद्देशीय संस्था, सोलापूर यांचा आहे.

सबब, समितीच्या शिफारशीनुसार व सोबत जोडलेल्या तक्त्यातील दरानुसार विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृहातील मेस क्र. २ चालविणेचे काम सर्वात कमी दर असलेले मे. गोकर्ण मागासवर्गीय महिला बहुउद्देशीय संस्था, सोलापूर यांना अकरा महिन्याच्या कालावधीसाठी देण्याची बाब विचारार्थ).

**ठराव:** **अ) सोबतच्या तौलनिक तक्त्यातील सर्वात कमी दर मे. गोकर्ण मागासवर्गीय महिला बहुउद्देशीय संस्था, सोलापूर यांचे असल्याने या फर्मला विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृहातील मेस क्र. २ अकरा महिन्याच्या कालावधीकरीता चालविण्यास देण्यास मान्यता देण्यात आली.**

**ब) सोबतच्या तौलनिक तक्त्यातील L1 यांनी असमर्थता दर्शविल्यास प्रशासकीय मान्यतेअंती नियमाप्रमाणे L2, L3 यांना कार्यारंभ आदेश निर्गमित करावे असे ठरले.**

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

कामाचे नांव- मुलांचे वसतीगृह येथील मेस क्र.२ चालविणे
कामाचा कालावधी - ११ महिने
बयाणा रक्कम - रु.५,०००/-

दि.११/०६/२०१३

दराचा तुलनात्मक तक्ता

| अ. क्र. | तपशिल | मे. गोकर्ण मागासवर्गीय महिला बहुउद्देशीय संस्था, सोलापूर | | मे.हॉटेल शिवनेरी अँड मेस, सोलापूर | | मे.समर्थ टी हाऊस, सोलापूर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | निविदे मध्ये नमुद केलेले दर | | निविदे मध्ये नमुद केलेले दर | | निविदे मध्ये नमुद केलेले दर | |
| १ | दोन्ही वेळचे जेवण (प्रति महिना) (अमर्यादित)<br>१.चपाती/भाकरी<br>२.सुकी भाजी<br>३.पातळ भाजी<br>४ वरण/आमटी<br>५.भात<br>६.शेंगा चटणी/लोणचे/पापड/कोशींबीर<br>७.दहीवाटी/ताक<br>८.कांदा,लिंबू<br>आठवडयातून एक दिवस मिष्ठान्न भोजन | रु.१०११/- | L-1 | रु.१२९०/- | L-3 | रु.११००/- | L-2 |
| २ | एका वेळेचे वरील मेनूप्रमाणे जेवण [प्रति महिना] (अमर्यादित) | रु.५०५/- | L-1 | रु.६७५/- | L-3 | रु.५५०/- | L-2 |
| ३ | अल्होपाहार पदार्थ | | | | | | |
| | १.शिरा/उपीट [१ प्लेट]१०० ग्रॅम | रु.१०/- | L-3 | रु.५/- | L-1 | रु.८/- | L-2 |
| | २. पोहे [१ प्लेट] १०० ग्रॅम | रु.१०/- | L-3 | रु.५/- | L-1 | रु.८/- | L-2 |
| | ३.वडा सांबर [२ नग] ४० ग्रॅम प्रति नग | रु.१०/- | L-1 | रु.१०/- | L-1 | रु.१६/- | L-2 |
| | ४.इडली सांबर [२ नग] ३० ग्रॅम प्रति नग | रु.१०/- | L-2 | रु.९/- | L-1 | रु.२०/- | L-3 |
| | ५.टोमॅटो ऑम्लेट [१ प्लेट] | रु.१२/- | L-2 | रु.१०/- | L-1 | रु.१६/- | L-3 |
| | ६. चहा [साधा] ६५ मिली | रु.६/- | L-2 | रु.५/- | L-1 | रु.५/- | L-1 |
| | ७.चहा[स्पेशल] ६५ मिली | रु.८/- | L-2 | रु.६/- | L-1 | रु.१०/- | L-3 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७.चहा[स्पेशल] ६५ मिली | रु.८/- | L-2 | रु.६/- | L1 | रु.१०/- | L3 |
| ८.नेस कॉफी -६५ मिली | रु.१०/- | L-2 | रु.७/- | L1 | रु.१२/- | L3 |
| ९.दूध - १०० मिली | रु.१०/- | L-2 | रु.६/- | L1 | रु.१०/- | L3 |
| १०.समोसा/कचोरी/वडापाव[१ नग] [८० ग्रॅम प्रति नग] | रु.१०/- | L-2 | रु.५/- | L1 | रु.८/- | L3 |
| ११.मॅगी | रु.१५/- | L-2 | रु.१०/- | L1 | रु.१५/- | L2 |
| १२.शाबुदाना खिचडी १२५ ग्रॅम | रु.१५/- | L-2 | रु.१०/- | L1 | रु.१०/- | L1 |
| १३.शाबुवडा [२ नग] ४० ग्रॅम प्रति नग | रु.१५/- | L-2 | रु.१२/- | L1 | रु.१६/- | L3 |
| १४.मिसळ पाव | रु.१५/- | L-2 | रु.१२/- | L1 | रु.१५/- | L2 |
| १५.कोल्ड्रींक्स | M.R.P.प्रमाणे | L-1 | M.R.P.प्रमाणे | L1 | M.R.P.प्रमाणे | L1 |
| १६.पाणी बॉटल | M.R.P.प्रमाणे | L-1 | M.R.P.प्रमाणे | L1 | M.R.P.प्रमाणे | L1 |
| १७.मिल्क शेक | M.R.P.प्रमाणे | L-1 | रु.१५/- | | M.R.P.प्रमाणे | |
| १८.आईसक्रीम | M.R.P.प्रमाणे | L-1 | M.R.P.प्रमाणे | L1 | M.R.P.प्रमाणे | L1 |
| १९.कोकम | M.R.P.प्रमाणे | L-1 | रु.१०/- | | M.R.P.प्रमाणे | |
| शेरा | शिफारस | L-1 | L-3 | | L-2 | |

विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृह येथील मेस क्र.२ चालविणेचे काम (जेवणाखाली) सर्वात कमी दराचे पुरवठाधारक मे.गोकर्ण मागासवर्गीय महिला बहुउद्येशीय संस्था मर्या, सोलापूर यांना देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सदस्य<br>खरेदी समिती | सदस्य<br>खरेदी समिती | सदस्य<br>खरेदी समिती | वित्त व लेखाधिकारी | प्र. कुलसचिव | मा.कुलगुरु सों |

**[ १८ ] विद्यापीठ परिसरातील इमारती तसेच सोलापूर शहरातील रंगभवन समोरील अभ्यासकेंद्र येथील इमारतींचे साफसफाई करणे या कामाचे जाहीर निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणीः विद्यापीठ परिसरातील इमारती तसेच सोलापूर शहरातील रंगभवन समोरील अभ्यासकेंद्र येथील इमारतींचे साफसफाई करणे या कामाची जाहीर निविदा सूचना दि.०३/०५/२०१३ रोजीच्या दै. लोकमत या दैनिकामधून देण्यात येवून दि.२२/०५/२०१३ पर्यंत निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार, अंतिम दिनांकापर्यंत विद्यापीठ कार्यालयास ४ निविदा प्राप्त झाल्या. निविदाधारक व खरेदी समिती सदस्यांसमोर सदर कामाची तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असता, प्राप्त निविदांपैकी ४ निविदाधारक तांत्रिक निविदेमध्ये पात्र झाले. सदरील ४ निविदाधारकांच्या आर्थिक निविदा उघडण्यात आल्या. सदरील निविदांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. त्यानुसार, सर्वात कमी दर मे. आरती मल्टी सर्व्हिसेस, सोलापूर यांचे आहेत.

सबब, समितीच्या शिफारशीनुसार व सोबत जोडलेल्या तक्त्यातील दरानुसार विद्यापीठ परिसरातील इमारती तसेच सोलापूर शहरातील रंगभवन समोरील अभ्यासकेंद्र येथील इमारतींचे साफसफाई करणे हे काम मे. आरती मल्टी सर्व्हिसेस, सोलापूर यांना अकरा महिन्याच्या कालावधीसाठी देण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः**

**अ) सोबतच्या तौलनिक तक्त्यातील सर्वात कमी दर मे. आरती मल्टी सर्व्हिसेस, सोलापूर यांचे असल्याने या फर्मला विद्यापीठ परिसरातील इमारती तसेच सोलापूर शहरातील रंगभवन समोरील अभ्यासकेंद्र येथील इमारतींचे साफसफाई करण्याचे काम अकरा महिन्याच्या कालावधीकरीता चालविण्यास देण्यास मान्यता देण्यात आली.**

**ब) सोबतच्या तौलनिक तक्त्यातील L1 यांनी असमर्थता दर्शविल्यास प्रशासकीय मान्यतेअंती नियमाप्रमाणे L2, L3, L4 यांना कार्यारंभ आदेश निर्गमित करावे असे ठरले.**

# सोल[illegible] विद्यापीठ, सोलापूर

कामाचे नांव - विद्यापीठ परिसरातील विविध इमारती व सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र, अतिथीगृह इमारतीची साफसफाई करणे.

दि. 22/05/2013

कामाचा कालावधी - ११ महिना
बयाणा रक्कम - रु.३,०००/-

आर्थिक निविदा

| अ. क्र. | मक्तेदाराचे नांव | बयाणा रक्कम पावती क्र. व दिनांक | पात्र/अपात्र | निविदेमध्ये नमूद केलेले दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. राहूल रंगकाम व पेंटिंग सेवा, स्वयंरोजगार सहकारी संस्था. मर्यादित सोलापूर. | पा. क्र. ११११३ दि.२१.०५.२०१३ | पात्र | रु.९७,५००/- प्रति महिना | L-4 |
| २ | मे. सुभाष मजूर सह.सोसायटी, सोलापूर | पा. क्र. ११३१ दि.२२.०५.२०१३ | पात्र | रु.३१,९९१/- प्रति महिना | L-2 |
| **३** | **मे. आरती मल्टी सर्व्हिसेस, सोलापूर** | **पा. क्र. ११०६ दि.२०.०५.२०१३** | **पात्र** | **रु.२७,५००/- प्रति महिना** | **L-1 शिफारस** |
| ४ | मे. साई सर्व्हिसेस, पुणे | पा. क्र. ११३७ दि.२२.०५.२०१३ | पात्र | रु.४१,०००/- प्रति महिना | L-3 |

विद्यापीठ परिसरातील विविध इमारती व सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र, अतिथीगृह इमारतीची साफसफाई करणे या कामाचे सर्वात कमी दराचे मक्तेदार मे.आरती मल्टी सर्व्हिसेस, सोलापूर यांचे रू.२७,५००/- इतके प्रति महिना या दराने काम देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| सही/- सदस्य खरेदी समिती | सही/- सदस्य खरेदी समिती | सही/- सदस्य खरेदी समिती | सही/- वित्त व लेखाधिकारी | सही/- प्र. कुलसचिव | सही/- मा.कुलगुरु सो |
|---|---|---|---|---|---|

**[ १९ ] शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अधिकच्या कामाचा भत्ता देण्याबाबतची सुधारीत नियमावली व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाकडील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेपूर्वी / वेळेनंतर किंवा कार्यालयीन सुट्टीदिवशी जादा काम करावे लागते. संबंधितांनी जादा केलेल्या कामाच्या मोबदल्यात त्यांना अधिकच्या कामाचा भत्ता आदा केला जातो. महाराष्ट्र शासनाने शासकीय / निमशासकीय सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना ६ वा वेतन आयोग लागू केल्याने त्या अनुषंगाने अधिकच्या कामाचा भत्त्यामध्ये वाढ झालेली आहे. सुधारीत दराने अधिकच्या कामाचा भत्ता शिक्षकेतर सेवकांना लागू करण्याबाबत सोलापूर विद्यापीठ कर्मचारी संघटनेनी विनंती केली आहे. शिवाजी विद्यापीठाने शिक्षकेतर सेवकांसाठी कर्मचाऱ्यांना अधिकच्या कामाच्या दरामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा केली आहे. सोबत शिवाजी विद्यापीठाची अधिकच्या कामाची नियमावली जोडली आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | वर्ग - १ मधील उपकुलसचिव व समकक्ष अधिकारी | ₹५०/- प्रति तास |
| ब) | वर्ग - १ मधील सहा. कुलसचिव व समकक्ष अधिकारी | |
| क) | वर्ग - २ मधील कक्ष अधिकारी व समकक्ष अधिकारी | ₹४५/- प्रति तास |
| ड) | वर्ग - ३ मधील सहा. कक्ष अधिकारी व समकक्ष अधिकारी | ₹४०/- प्रति तास |
| इ) | वर्ग - ३ मधील वरिष्ठ लिपीक व समकक्ष अधिकारी | |
| ई) | वर्ग - ३ मधील कनिष्ठ लिपीक व समकक्ष अधिकारी | |
| फ) | वर्ग - ४ मधील सर्व कर्मचारी | ₹३०/- प्रति तास |

सदरचा विषय दि.०३/०५/२०१३ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत ठेवला असता बैठकीत खालीलप्रमाणे ठराव झाला आहे.

| |
|---|
| विद्यापीठकडील शिक्षकेतर सेवकांना माहे एप्रिल, २०१३ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वरील सुधारीत दराने अधिकच्या कामाचा भत्ता आदा करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यात आली. |

सबब, शिक्षकेतर सेवकांना माहे एप्रिल, २०१३ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वरीलप्रमाणे सुधारीत दराने अधिकच्या कामाचा भत्ता आदा करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठरावः **शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अधिकच्या कामाच्या भत्त्यामध्ये खालील तक्त्यात वर्ग १ ते ४ पदनामनिहाय सुधारीत दराबाबतची वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून त्याची अंमलबजावणी दि.१ जुलै, २०१३ पासून करण्यास मान्यता देण्यात आली.**

| अ. क्र. | तपशील | पूर्वीचे दर (प्रति तास) | सुधारीत दर (प्रति तास) |
|---|---|---|---|
| **अ)** | **वर्ग - १ मधील उपकुलसचिव व समकक्ष अधिकारी** | **४४/-** | **५०/-** |
| **ब)** | **वर्ग - १ मधील सहा. कुलसचिव व समकक्ष अधिकारी** | **३६/-** | |
| **क)** | **वर्ग - २ मधील कक्ष अधिकारी व समकक्ष अधिकारी** | **३२/-** | **४५/-** |
| **ड)** | **वर्ग - ३ मधील सहा. कक्ष अधिकारी व समकक्ष अधिकारी** | **२८/-** | **४०/-** |
| **इ)** | **वर्ग - ३ मधील वरिष्ठ लिपीक व समकक्ष अधिकारी** | **२४/-** | |
| **ई)** | **वर्ग - ३ मधील कनिष्ठ लिपीक व समकक्ष अधिकारी** | **२४/-** | |
| **फ)** | **वर्ग - ४ मधील सर्व कर्मचारी** | **१६/-** | **३०/-** |

## [ २० ] विद्यापीठाकडील सर्व कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांकरीता वैयक्तिक संगणक/ लॅपटॉप खरेदी कर्ज योजना राबविणेबाबत.

(टिपणी - उपरोक्त विषयांकित प्रकरणी सादर करण्यात येते की, पुणे विद्यापीठाच्या धर्तीवर सोलापूर विद्यापीठातील सर्व कायम सेवकांसाठी संगणक / लॅपटॉप खरेदी योजना राबविण्याकरीता सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा कोंडी, सोलापूर यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्यामुळे दि.०३/०४/२०१३ रोजी मा.कुलगुरु महोदय यांच्या दालनामध्ये मा.कुलगुरु महोदय व वित्त व लेखा अधिकारी यांची बँकेच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक झाली. त्यामध्ये चालू व्याजदरापेक्षा कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन द्यावे अशी विद्यापीठाकडून मागणी करण्यात आली. त्यानंतर कर्जासाठी एकूण किती इच्छूक सेवक आहेत याची माहिती देणेबाबत बँकेने कळविले त्यास अनुसरुन सर्व विभाग व संकुलाकडून कर्ज योजनेबाबत इच्छुक असणाऱ्या सेवकांची माहिती घेण्यात आली. प्राप्त माहितीवरुन एकूण अंदाजे १२० सेवक कर्ज योजनेस तयार असून त्यांची माहिती बँकेकडे देण्यात आली आहे.

संगणक कर्ज योजनेचा प्रस्ताव बँकेच्या मुंबई येथील मुख्य शाखेकडे पाठविला असून याबाबत दोन दिवसात निर्णय होणार आहे असे शाखा व्यवस्थापक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा कोंडी, सोलापूर यांनी दुरध्वनीद्वारे कळविले होते. कर्जाच्या मुदलाची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांने मासिक हप्त्याद्वारे भरावयाची असून व्याजाची रक्कम विद्यापीठ भरणार आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे नवीन लेखाशीर्ष उघडणे व त्यास तरतुद करणे आवश्यक आहे.

**For the year 2013-14 (New Item)**

| Sr. No. | Budget Head | Name of Section | Original Provision for | Revised Provision for |
|---|---|---|---|---|
| 1. | "Interest on Computer / Laptop Loan for Employees" (New Budget) | Finance & Accounts | 00 | **5,00,000/-** |
| 2. | "Computerisation of Finance Section " | Dev. Budget Part - II | 10,00,000/- | **5,00,000/-** |

उपरोक्त तक्यातील अ.क्र. १ नुसार अंदाजपत्रकात नवीन लेखाशीर्ष उघडणे व त्यास अ.क्र.२ नुसार तरतुदीचे पुनर्नियोजन करावे लागणार आहे. कर्ज योजनेबाबतच्या नियम व अटी तयार केल्या असून सोबत जोडल्या आहेत. त्यानुसार सदरचा विषय दि.३०/०५/२०१३ रोजीच्या वित्त व लेखा समितीमध्ये ठेवला असता त्यावर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.

**ठराव :** सोलापूर विद्यापीठातील सर्व कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांसाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा कोंडी, सोलापूर यांचेमार्फत संगणक / लॅपटॉप कर्ज योजना बँकेने कळविल्याप्रमाणे व सोबत जोडलेल्या नियम व अटी प्रमाणे राबविणेसाठी तसेच कर्जाचे व्याज वरील तरतुदीमधून भागविण्यास व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.

शाखा व्यवस्थापक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा कोंडी, सोलापूर यांनी दि.०४/०६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार संगणक / लॅपटॉप कर्ज योजनेस वरिष्ठ कार्यालयाने मान्यता दिली असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

कर्जाची मर्यादा रुपये ३०,०००/- पर्यंत, कर्ज रकमेच्या २०% इतके मार्जिन मनी (वैयक्तिक वाटा), त्यावर १३.२०% द.सा.द.शे. व्याज दर व त्याची परतफेडीची कालमर्यादा ३६ महिन्याची असल्याचे नमूद केले आहे.

सबब, सोलापूर विद्यापीठातील सर्व कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांसाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा कोंडी, सोलापूर यांचेमार्फत संगणक / लॅपटॉप कर्ज योजना बँकेने दि.०४/०६/२०१३ रोजीच्या पत्रानुसार कळविल्याप्रमाणे व सोबत जोडलेल्या नियम व अटी प्रमाणे तसेच कर्जाचे व्याज उपलब्ध तरतुदीतुन भागविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: विद्यापीठाकडील सर्व कायम शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांकरीता वैयक्तिक संगणक/ लॅपटॉप खरेदी कर्ज योजनेस विद्यापीठ नियम व अटीन्वये कर्जाचे व्याज उपलब्ध तरतूदीतून भागविण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ २१ ] विद्यापीठासाठी कुरियर सेवा वार्षिक दर करार करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणीः विद्यापीठास टपालाची सेवा पुरविण्यासाठी कुरियर सेवा वार्षिक दर करार करणे या कामाकरिता दै.सकाळ व दै.पुण्यनगरी या वर्तमानपत्रामध्ये तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दि.२४/०५/२०१३ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यास अनुसरुन दि.३१/०५/२०१३ रोजी दुपारी १२ वाजेपर्यत निविदा विक्री तसेच निविदा स्वीकृती ठेवण्यात आली होती. एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता खरेदी समिती सदस्यांच्या समोर निविदा उघडण्यात आल्या असता, प्राप्त तीन निविदा तांत्रिक निविदेत पात्र झाल्याने त्यांच्या आर्थिक निविदा उघडण्यात आल्या. विद्यापीठासाठी टपालाची कुरियर सेवा पुरविण्यासाठी वार्षिक दर करार करणे कामाच्या दराचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. तक्त्यानुसार मे. तेज कुरियर सोलापूर, यांचे दर सर्वात कमी आहेत. त्यानुसार विद्यापीठाला मे. तेज कुरियर सोलापूर, यांच्याकडून कुरियर सेवा घेण्याकरिता वार्षिक दर करार करण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः**

**अ) सोबतच्या तौलनिक तक्त्यातील सर्वात कमी दर मे. तेज कुरिअर, सोलापूर यांचे असल्याने या फर्मला विद्यापीठासाठी कुरियर सेवेकरिता त्यांच्यासमवेत वार्षिक दर करार करण्यास मान्यता देण्यात आली.**

**ब) सोबतच्या तौलनिक तक्त्यातील L1 यांनी असमर्थता दर्शविल्यास प्रशासकीय मान्यतेअंती नियमाप्रमाणे L2, L3 यांना कार्यारंभ आदेश निर्गमित करावे असे ठरले.**

## सोलापूर विद्यापीठ सोलापूर
## कुरीयर सेवेचे दरपत्रक
## लिफाफा क्र ०२ दर पत्रक

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | ठिकाण | दर सर्व करासहीत प्रत्येकी २०० ग्रॅम पर्यंत | दर सर्व करासहीत प्रत्येकी २०० ग्रॅम पुढील | टपाल पोहचण्याचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. तेज कुरियर सोलापूर | सोलापूर शहर | रूपये -१०/- 8 | रूपये - ८/- 6 | २४ तास | L - १ |
| | | सोलापूर जिल्हा | रूपये -१५/- 13 | रूपये -१०/- 8 | २४ तास | |
| | | संपुर्ण महाराष्ट्र | रूपये -२०/- 18 | रूपये -१३/- 11 | २४ ते ४८ तास | |
| | | अंतरराज्य | रूपये -३५/- 33 | रूपये -२५/- 23 | ४८ ते ७२ तास | |
| २ | दिप्ती सर्व्हिसेस मुंबई | सोलापूर शहर | रूपये -१२/- | रूपये -१०/- | २४ तास | L- ३ |
| | | सोलापूर जिल्हा | रूपये -१६/- | रूपये -१२/- | २४ ते ४८ तास | |
| | | संपुर्ण महाराष्ट्र | रूपये -२२/- | रूपये -१५/- | २४ ते ४८ तास | |
| | | अंतरराज्य | रूपये -३८/- | रूपये -२८/- | ४८ तास ते ७२ तास | |
| ३ | राजेंद्र तुकाराम गुरव | सोलापूर शहर | रूपये -११.५० | रूपये -९.५०/- | २४ तास | L - २ |
| | | सोलापूर जिल्हा | रूपये -१६.५० | रूपये -११.५०/- | २४ ते ७२ तास | |
| | | संपुर्ण महाराष्ट्र | रूपये -२२.०० | रूपये -१५.००/- | २४ ते ७२ तास | |
| | | अंतरराज्य | रूपये -३७.०० | रूपये -२७.००/- | २४ ते ७२ तास | |

**मे. तेज कुरियर सोलापूर** यांचे दर (सर्व करासहीत) न्युनतम असून त्यांनी रु.**२/- (दोन रुपये फक्त )** इतकी सूट वरील प्रत्येकी सर्व दरास दिली आहे. त्यामुळे त्यांचे अंतिम दर पुढील प्रमाणे आहेत. **२०० ग्रॅम पर्यत** सोलापूर शहर **रु. ८/-**, सोलापूर जिल्हा **रु.१३/-**, संपूर्ण महाराष्ट्र **रु.१८/-**, अंतरराज्य **रु.३३/-** व **२०० ग्रॅम वजनापुढील** प्रत्येकी दर सोलापूर शहर **रु. ६/-** सोलापूर जिल्हा **रु. ८/-** संपूर्ण महाराष्ट्र **रु.११/-** अंतरराज्य **रु.२३/-** असे असून सदर दराने त्यांचे सोबत दर करार करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सदस्य खरेदी समिती | सदस्य खरेदी समिती | सदस्य खरेदी समिती | वित्त व लेखाधिकारी | प्र.कुलसचिव | **मा.कुलगुरु सो.** |

**[ २२ ]** **आर्कि. श्री. यादगिरी कोंडा यांच्या थकित देयका संबंधी गठीत करण्यात आलेल्या Mediation समितीचे कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या आदेशार्थ.**

(टिपणी: आर्कि. श्री. यादगिरी कोंडा यांनी बिलापाटी देय असलेली रक्कम वसूल होऊन मिळणे कामी दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरण व दिवणी दाव्याच्या अनुषंगाने मा. कुलगुरु व आर्कि. श्री. यादगिरी कोंडा यांच्या सहीने सदरच्या प्रकरणामध्ये तडजोड होण्याची शक्यता असल्याबाबत नमूद करुन प्रकरण Mediation साठी पाठविण्याबाबत अर्ज करण्यात आला होता.

त्या संदर्भात व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १९/११/२०१२ रोजीच्या विषय क्र.८ (१) च्या ठरावानुसार ५ सदस्यीय Mediation समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या एकूण पाच बैठका आयोजित करण्यात आलेल्या होत्या. समितीची ५ वी बैठक दिनांक १२/०४/२०१३ रोजी आयोजित करण्यात आली असता या बैठकीत श्री. यादगिरी कोंडा हे समितीसमोर चर्चेसाठी हजर होते तथापि, या दिवशीही तडजोड होवू शकली नाही. या संदर्भात सादर करण्यात आलेल्या टिपणीवर मा. कुलगुरु महोदयांनी हे प्रकरण व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करावे असे आदेश दिलेले आहेत.

सबब, तडजोड समितीच्या झालेल्या बैठकीचे कार्यवृत्तांत बाबत पुढील कार्यवाही करण्याबाबत आदेशार्थ).

**ठराव:** **आर्कि. श्री. यादगिरी कोंडा यांच्या थकित देयका संबंधी गठीत करण्यात आलेल्या Mediation समितीच्या एकूण झालेल्या ०५ बैठकांच्या कार्यवृत्तांतास व समितीच्या अहवालास मान्यता देण्यात आली.**

**[ २३ ] मा. सचिव, जय जगदंबा बहुउद्देशिय संस्था, सर्जापूर ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे दंड कमी करण्याबाबतचे पत्र विचारार्थ.**

(टिपणी: श्री. तकडे अण्णासाहेब गुंडप्पा हे शै. वर्ष २०११-१२ मध्ये जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वैराग या महाविद्यालयात बी. एड या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत व त्याच कालावधीत श्री. नूतन प्रशाला, विजापूर रोड, सोलापूर या महाविद्यालयात पूर्ण वेळ शिक्षक म्हणून कार्यरत असल्याची तक्रार श्री. सुरवसे अनिल रामचंद्र यांच्याकडून प्राप्त झालेली होती.

सदर तक्रारीची तथ्यता पडताळून घेण्यास्तव मा. मुख्याध्यापक, नूतन प्रशाला, विजापूर रोड. सोलापूर व मा. अध्यक्ष / सचिव, जय जगदंबा बहुउद्देशिय संस्था, संचलित जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांना पत्राद्वारे आवश्यक माहिती सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने मा. प्र. मुख्याध्यापक, श्री. नूतन प्रशाला, विजापूर रोड, सोलापूर व जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वैराग यांच्याकडून माहिती पुढील प्रमाणे प्राप्त झालेली होती.

**मा. प्र. मुख्याध्यापक, नूतन प्रशाला यांनी** श्री. तकडे आण्णासाहेब गुंडप्पा हे नूतन प्रशाला, सोलापूर या शाळेत शै. वर्ष २०११-१२ मध्ये पूर्णवेळ शिक्षकपदी असल्याचे व त्यांची नेमणूक दि.२१/०७/२००३ झालेली असून ते आजतागय कार्यरत असल्याचे कळविले होते. तसेच त्यांनी श्री. तकडे अण्णासाहेब गुंडप्पा यांचे सेवापुस्तिका व हजेरी पत्रकाची सत्यप्रती सादर केलेली होती.

**जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वैराग, ता. बार्शी यांनी** श्री. तकडे अण्णासाहेब गुंडप्पा यांनी नोकरी करत नसल्याचे महाविद्यालयाकडे सादर केलेल्या हमीपत्राची छायांकित प्रत व ते सतत गैर हजर राहिल्यामुळे महाविद्यालयाने सदर बाबत केलेल्या पत्र व्यवहाराची छायांकित प्रत सादर केलेली होती.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेली माहिती व त्यासोबतची कागदपत्रे अवलोकनार्थ घेता प्रस्तुत तक्रारी संदर्भात सर्वकष चौकशी होणे हे अत्यंत जरुरीचे असल्याने खालीलप्रमाणे मा. कुलगुरु महोदयांनी त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत केलेली होती. तोपर्यंत प्रस्तुत प्रकरणातील गैरतक्रारदार श्री. तकडे अण्णासाहेब गुंडप्पा यांचा बी. एड अभ्यासक्रमाचा निकाल राखीव ठेवण्याबाबात परीक्षा विभागास कळविण्यास आले होते.

१. **प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर, अध्यक्ष २) प्रा. डॉ. इनामदार ए. ए., सदस्य**

३. **प्राचार्य डॉ. एस. बी. क्षीरसागर, सदस्य**

उपरोक्त समितीने संबंधितांकडे प्रत्यक्ष भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन अहवाल सादर केला. सदर अहवालानुसार विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीत तथ्यता असल्याचे निदर्शनास आले होते.

प्राप्त अहवालानुसार श्री. तकडे अण्णासाहेब गुंडप्पा यांनी जाणूनबुजून नोकरी करत

नसल्याचे खोटे हमीपत्र सादर केले होते व महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५ टक्के भरलेली नसताना संबंधित विद्यार्थ्यांचा परीक्षा फॉर्म विद्यापीठाकडे सादर केलेला होता. सदर प्रकरणात दोन्ही पक्षकारांनी गंभीर स्वरुपाचे कृत्य केलेले होते.

उपरोक्त प्रकरण व प्राप्त अहवालावर मा. कायदा अधिकारी यांच्याकडे सदर बाबत पुढील कोणती कार्यवाही करावी याबाबत कायदेशीर सल्ला मागविण्यात आला असता तक्रारीची पडताळणी करण्यास्तव समितीने सादर केलेल्या अहवालानुसार व त्यासोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे अवलोकनी घेता श्री. तकडे अण्णासाहेब व जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय व इतर यांनी सादर केलेले म्हणणे हे परस्पर विरोधी असल्याचे सकृत दर्शनी दिसत असल्याचे व याबाबतची शहानिशा करणेकामी नैसर्गिक न्याय तत्वानुसार श्री. तकडे व इतर संबंधितांना व्यवस्थापन समितीसमोर प्रत्यक्ष हजर राहून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देवून तद्नंतर निर्णय घेणे उचित होईल असे कळविले होते.

त्याअनुषंगाने प्रस्तुत प्रकरण दि.२०/०७/२०१२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात आला होता व म्हणणे सादर करण्यास्तव संबंधितांना उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर बैठकी दरम्यान उभयतांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केलेले होते. सदर प्रकरणाबाबत व्यवस्थापन परिषदेने खालीलप्रमाणे निर्णय दिलेला होता.

१. **श्री. तकडे अण्णासाहेब गुंडप्पा यांचा बी. एड. अभ्यासक्रमाचा Performance रद्द करावा.**
२. **जय जगदंबा बहुउद्देशिय संस्था, सर्जापूर, ता. बार्शी या संस्थेस दंडक क्र.(O).४४ नुसार एका विद्यार्थ्यांच्या टयूशन फिच्या १० पट दंड करावा.**

उपरेक्त निर्णयानुसार परीक्षा विभागास श्री. तकडे अ. गुं. यांचा Performance रद्द करण्याची पुढील कार्यवाही करण्याबाबत अंतर्गत कार्यालयीन टिपणी निर्गमित व मा. अध्यक्ष / सचिव, जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालया यांना रु.३,१४,२००/- इतकी दंडाची रक्कम भरण्याबाबत पत्राद्वारे कळविले होते व दि.२०/०७/२०१२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार परीक्षा विभागाकडून श्री. तकडे अ. गुं. यांचा Performance रद्द करण्यात आला आहे.

तथापि, संबंधित संस्थेकडून दंडाची रक्कम न भरल्याने संस्थेस पुनःश्च दि.१५/१०/२०१२ रोजीच्या स्मरण पत्राद्वारे कळविण्यात आले होते. या उपरोक्त संस्थेने दंडाची रक्कम न भरल्याने पुनःश्च दि.१९/११/२०१२ रोजी आणखी एक स्मरण पत्र निर्गमित करण्यात आले होते. दोन स्मरण पत्रे पाठवूनही संस्थेने दंडाची रक्कम न भरल्याने पुनःश्च अंतिम स्मरण पत्र व दि.३१/१२/२०१२ पर्यंत दंडाची रक्कम भरण्याबाबत व विहित मुदतीत दंडाच रक्कम न भरल्यास महाविद्यालयावर म. वि. कायदा १९९४ व तद्अनुषंगिक परिनियमान्वये कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आले.

**त्यास अनुसरुन संस्थेच्यावतीने ॲड. रणजीत नेताजी गुंड यांचे धमकीवजा उत्तर**

**पत्रान्वये प्राप्त झालेले होते. (प्रपत्र -अ)**

प्राप्त पत्र मा. कायदा अधिकारी यांचेकडे सादर करुन त्यांचा अभिप्राय मागविण्यात आला होता. त्यानुसार कायदा अधिकारी यांनी सस्थेने रक्कम भरण्याचे नाकारुन मा. व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाची अंमलबजावणी करण्यास नाकारले असल्याचे सदरचे उत्तर मा. व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करुन व्यवस्थापन परिषदेकडून पुढील मार्गदर्शन घेणे जास्त योग्य व उचित राहील असा अभिप्राय सादर केलेला होता.

त्यास अनुसरुन प्राप्त दंड भरण्यासंदर्भात धमकीवजा उत्तर दि.१५/०२/२०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषद सभेसमोर सादर करण्यात आला असता खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**"अध्यक्ष / सचिव, जय जगदंबा बहुउद्देशिय संस्था, सर्जापूर, ता. बार्शी, जि. सोलापूर यांना दंडाची रक्कम एक महिन्यात भरावी अन्यथा महाराष्ट्र विद्यापठे कायदा १९९४ व तद्अनुषंगिक परिनियमान्वये कार्यवाही करण्यात येईल अशा प्रकारची नोटिस विद्यापीठ पॅनलमधील वकीलामार्फत देण्यात याव असे ठरले"**

सदर ठरावानुसार विधी व सल्ला विभागामार्फत कार्यवाही होवून सदर संस्थेस दंडाची रक्कम भरण्यासंदर्भात नोटिस निर्गमित करण्यात आली आहे.

तथापि, संस्थेने दंडाची रक्कम विद्यापीठाकडे न भरता व महाविद्यालय स्वतः या प्रकरणात दोषी असल्याचे तत्कालिन प्र. प्राचार्य यांनी व्यवस्थापन परिषद बैठकी समोर लेखी दिले असता स्वतःची चूक संबंधित विद्यार्थ्यांवर लादून दंडाची रक्कम माफ करण्याबाबत व संबंधित विद्यार्थ्यांने प्रवेश घेते वेळी भरलेली शिक्षण शुल्क दंडापोटी भरण्यास तयार असल्याचे कळविले आहे.

१. **महाविद्यालयात दोषी असताना स्वतःची चूक न कळत विद्यापीठावर लादत आहे.**
२. **संस्थेने विद्यापीठाच्या अंतिम स्मरण पत्रास संस्थेच्या वकिलामार्फत उत्तर दिले असून सदर उत्तर अवलोकनी घेता सदर पत्र हे धमकीवजा असल्याचे दिसून येते व संस्था वकिलांनी मा. संचालक महोदयांना कोणत्याही प्रकारचे पत्र पाठवून विनाकारण कोणतीही चूक नसताना दंड आकारुन दंडाची मागणी करु नये. तसेच बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करुन व म. वि. कायदा १९९४ मधील तरतूदीचा गैरफायदा घेवून आमचे आशिल यांचे विरुध्द चुकीची कार्यवाही करुन आमचे आशिल यांना शारिरीक व मानसिक त्रास देवू नये. येणे प्रमाणे जर आपण वागणूक केली नाही तर आमचे आशिल मा. संचालक, मविविमं यांचे विरुध्द वेळप्रसंगी योग्य ती कडक दिवाणी अथवा फौजदार कार्यवाही करतील व त्याचा होणार खर्चास व परिणामास तसेच अंतिम स्मरणपत्रातील उत्तराचे खर्चास मा. संचालक हे जबाबदार राहतील असे मा. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांना इशारा दिला आहे. यावरुन संस्था विद्यापीठ प्रशासनाचा आदर करत नसल्याचे निदर्शनास येते.**

३. **तसेच प्रस्तुत प्रकरणाशी संबंधित असलेले सदर संस्थेच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी श्री. तकडे अण्णासाहेब गुंडप्पा हे सदर प्रकरणात दोषी असल्याने त्यांचेवर कारवाई करण्यात आलेली आहे त्यास्तव नैसर्गिक न्याय तत्वानुसार संस्थेचे महाविद्यालय हे तितकेच दोषी असल्याने त्यांचेवरही कारवाई पोटी आकारण्यात आलेली दंढाची रक्कम संस्था भरणे आवश्यक आहे.**

४. संबंधित संस्था संचलित महाविद्यालय हे विद्यार्थ्यांची हजेरी पूर्णपणे भरलेली नसताना व याबाबत संबंधित विद्यार्थ्याला गैरहजेरीबाबत पत्रान्वये कळविलेले असताना जाणूनबुजून संबंधित विद्यार्थ्यांचा परीक्षा फॉर्म विद्यापीठाकडे सादर करुन विद्यापीठाची फसवणूक केलेली आहे.

सबब, मा. सचिव, जय जगदंबा बहुउद्देशिय संस्था, सर्जापूर, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे दंड कमी करण्याबाबतचे पत्र विचारार्थ).

**ठरावः मा. सचिव, जय जगदंबा बहुउद्देशिय संस्था, सर्जापूर ता. बार्शी, जि. सोलापूर यांनी दंड कमी करण्याबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली.**

**[ २४ ] कुलसचिव निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९ (१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांच्या नामनिर्देशनाबाबत.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठाकडील कुलसचिव व वित्त व लेखा अधिकारी पद भरण्याकरिता जाहिरात देण्यात आलेली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन कुलसचिव पदासाठी १३ व वित्त व लेखा अधिकारी पदासाठी ०३ अर्ज प्राप्त झाले. प्राप्त अर्जाची छाननी समितीने छाननी केली असता, कुलसचिव पदासाठी ०५ अर्ज पात्र ठरविण्यात आले तर वित्त व लेखा अधिकारी पदासाठी एकही अर्ज पात्र झाला नाही.

सबब, कुलसचिव पद निवडीकरीता असणाऱ्या निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९ (१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

**ठरावः कुलसचिव निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९ (१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून खालील दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**१) श्री. बी. आर. गायकवाड**

**२) प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर**

**[ २५ ] सोलापूर विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा पालकासह, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा उतरविण्याबाबत मा.कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: सन २०१३-१४ या वर्षासाठी सोलापूर विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थी पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा उतरविण्यासाठी दैनिक संचार या वर्तमानपत्रातून जाहीर निविदा मागविण्यात आल्या. त्यास अनुसरुन अंतिम दि.२०/०५/२०१३ पर्यंत एकूण तीन विमा कंपनीकडून निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त विमा निविदांचा तूलनात्मक तक्ता सोबत जोडलेला आहे. तक्त्यानुसार युनाईटेड इंडीया इन्श्युरन्स कंपनी यांचे दर रु.१०.९० असे न्यूनतम होते. तथापि, सदर कंपनीने निविदेत नमूद केल्याप्रमाणे ओ पी डी व लॅबोरेटरी ॲक्सीडेन्टचा विमा देण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. त्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचे न्युनतम दर असलेले दि. न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी यांची निविदा विचारात घेतली असता, त्यांनी निविदेतील सर्व अटी मान्य करुन सर्व करासह रु.११/- प्रति विद्यार्थी पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा उतरविण्याबाबत संमती दर्शविलेली असल्याने त्यांच्याकडून विमा उतरविण्याची शिफारस समितीने केलेली आहे.

विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष दि.१५ जून, २०१३ पासून सुरु होणार आहे. विमा उतरविण्याकरिता यापूर्वी महाविद्यालयाकडून विमा रक्कम एकत्रित फी मधून एन. ई. एफ. टी. द्वारे विद्यापीठाकडे जमा करण्यात येत होती. त्यानंतर संबधित विद्यार्थी पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांची यादी व त्यासोबत विमा रक्कम भरणा केलेली पावती विद्यापीठाकडे पाठविली जात होती. प्राप्त प्रस्तावाची तपासणी केली असता, विद्यार्थ्यांची यादी व जमा रक्कम यामध्ये अनेक वेळा तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधितांची विमा उतरविण्याची कार्यवाही वेळेत पूर्ण करता येवू शकत नाही. तसेच विमा कंपनीला धनादेश देण्यासाठी कार्यालयीन मान्यता घेणे, धनादेश काढणे व धनादेश विमा कंपनीला पोहोच करणे इत्यादी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी किमान एक ते दोन दिवसाचा कालावधी लागत असून धनादेश वटल्यानंतरच संबंधितांचा विमा हा विमा कंपनीकडून सुरु करण्यात येतो . ज्या महाविद्यालयाचे प्रस्ताव शुक्रवारी प्राप्त होतात तसेच प्रत्येक शनिवार व रविवार विमा कंपनीस सुट्टी असल्याने त्यांचे धनादेश विमा कंपनीकडे देता येत नाहीत. या कालावधीत महाविद्यालयातील विद्यार्थी पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी हे अपघातात मयत झाल्यास त्यांच्या संपूर्ण नुकसान

भरपाईची जबाबदारी विद्यापीठावर येण्याची शक्यता आहे. ही बाब विद्यापीठाच्या हिताची नाही.

वरील परिच्छेदातील बाबी विचारात घेता,

१) संबंधित महाविद्यालयांनी विमा पॉलिसी उतरविण्यासाठी विमा हप्त्याची रक्कम रु.११/- प्रति विद्यार्थी व विमा लाभार्थ्यांची यादी इत्यादी परस्पर विमा कंपनीकडे पाठवावी आणि त्या यादीची एक प्रत वारसदार म्हणून (विमा पॉलिसी सुरु झाल्यानंतर अपघात घडल्यास त्याचा दावा करण्यासाठी) व विद्यार्थी कल्याण निधी प्रति विद्यार्थी रु.४/- विद्यापीठाकडे पाठवावी.

२) विद्यापीठातील विद्यार्थी पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांची विमा पॉलिसी उतरविण्यासाठी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाकडून आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करावी.

सबब, विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या महाविद्यालयातील विद्यार्थी पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा दि. न्यु इंडिया एश्योरेन्स कंपनी यांच्याकडून प्रति रु.११/- प्रमाणे उतरविण्याबाबतचा प्रस्ताव महाविद्यालयांना त्वरित कळविणे आवश्यक असल्याने व व्यवस्थापन परिषदेची सभा नजिकच्या काळात होणार नसल्याने महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम १४ (७) नुसार मा.कुलगुरुमहोदय यांनी सदर प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सर्व संलग्न महाविद्यालयांना दि.१४/०६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. मा.कुलगुरु महोदय यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीन केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठरावः** **मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**<u>मा.कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय :</u>**

[२६(१)] **शैक्षणिक वर्ष २०१३-१४ करिता विद्यापीठातील पदार्थ विज्ञान व संगणकशास्त्र संकुलासाठी शासन निर्णय क्र..टीईडी-२००८/(१८३)/०८/विशी-५ दि.५/११/२००८ नुसार सहाय्यक प्राध्यापकांची तात्पुरती पदे निर्माण करुन, Walk-in-Interview द्वारे भरती प्रक्रिया पूर्ण झाली आहे.निवड झालेल्या संबंधित पूर्णवेळ अभ्यागत शिक्षकांना आदेश निर्गमित करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठातील पदार्थ विज्ञान संकुल व संगणकशास्त्र संकुल मागील शैक्षणिक वर्षाप्रमाणेच विद्यापीठाने दिनांक १३/०६/२०१३ रोजी दिलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने स्थानिक निवड समितीची बैठक दि.२१/०६/२०१३ रोजी आयोजित करुन Walk-in-Interview द्वारे उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या असून, स्थानिक निवड समितीच्या शिफारशीनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा सारांश सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

| अ. क्र. | संकुलाचे नाव | पद | पद संख्या | वेतन अनुदानातून दरमहा खर्च | विद्यापीठ निधीतून दरमहा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | पदार्थ विज्ञान संकुल | सहाय्यक प्राध्यापक | ०२ | रु. १६,८००/- | रु.३,६००/- |
| २ | संगणकशास्त्र संकुल | सहाय्यक प्राध्यापक | ०६ | रु. ५०,४००/- | रु.७,२००/- |
| | | एकूण | ०८ | रु. ६७,२००/- | रु. १०,८००/- |

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ७७ मधील तरतूदीप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात पदे निर्माण करुन Walk-in-interview द्वारे भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात येवून सोबत शिक्षकांची विहित यादी जोडण्यात आली आहे. तरी संबंधित शिक्षकास अभ्यागत शिक्षक (On Visiting Basis Full Time) म्हणून नियुक्ती आदेश पारित करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव : **शैक्षणिक वर्ष २०१३-१४ करिता विद्यापीठातील पदार्थ विज्ञान व संगणकशास्त्र संकुलासाठी दि.०५/११/२००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार, सहाय्यक प्राध्यापकांची तात्पुरती पदे निर्माण करुन, Walk-in-Interview द्वारे भरती प्रक्रिया पूर्ण झाली आहे. निवड झालेल्या संबंधित पूर्णवेळ अभ्यागत शिक्षकांना तासिका तत्वावर आदेश निर्गमित करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[२६(२)] शैक्षणिक वर्ष २०१३-१४ करीता विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुल, भूशास्त्र संकुल, सामाजिकशास्त्रे संकुल, शिक्षणशास्त्र संकुल व वाणिज्य व व्यवस्थापन संकुलासाठी सहाय्यक प्राध्यापकांची तात्पुरती पदे निर्माण करुन Walk-in-Interview द्वारे भरती प्रक्रिया पूर्ण झाली आहे. निवड झालेल्या संबंधित पूर्णवेळ कंत्राटी /अभ्यागत शिक्षकांना आदेश निर्गमित करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणीः विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुल, भूशास्त्र संकुल, सामाजिकशास्त्रे संकुल, शिक्षणशास्त्र संकुल व वाणिज्य व व्यवस्थापन संकुल यांना मागील शैक्षणिक वर्षाप्रमाणेच विद्यापीठाने दिलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने, स्थानिक निवड समितीची बैठक दि.२१/०६/२०१३ रोजी आयोजित करुन, Walk-in-Interview द्वारे उमेदवारांच्या मूलाखती घेण्यात आलेल्या असून, स्थानिक निवड समितीच्या शिफारसीनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा सारांश सोबत जोडलेल्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ७७ मधील तरतूदीप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात पदे निर्माण करुन, Walk-in-Interview द्वारे भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात येऊन सोबत जोडलेल्या तक्त्यातील उमेदवारांना कंत्राटी/अभ्यागत शिक्षकास नियुक्ती आदेश पारित करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव : **शैक्षणिक वर्ष २०१३-१४ करीता विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुल, भूशास्त्र संकुल, सामाजिकशास्त्रे संकुल, शिक्षणशास्त्र संकुल व वाणिज्य व व्यवस्थापन संकुलासाठी सहाय्यक प्राध्यापकांची तात्पुरती पदे निर्माण करुन Walk-in-Interview द्वारे भरती प्रक्रिया पूर्ण झाली आहे. निवड झालेल्या संबंधित कंत्राटी /अभ्यागत शिक्षकांना एकत्रित वेतनावर (Consolidated Salary) आदेश निर्गमित करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[२६(३)] विद्यापीठाच्या विविध संकुलात शैक्षणिक वर्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी / अभ्यागत पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक यांचे दरमहा वेतनवाढ करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी:- विद्यापीठातील रसायनशास्त्र, भूशास्त्र, पदार्थविज्ञान, संगणकशास्त्र व सामाजिकशास्त्रे अनुदानित संकुले तसेच शिक्षणशास्त्र, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विनाअनुदानित संकुले या सर्व संकुलात विविध अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी संख्या वाढल्यामुळे कार्यभार वाढला आहे. कार्यभारानुसार अधिकची शिक्षक पदे निर्माण झालेली आहेत. सदरची शिक्षक पदे महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७७ तरतुदीनुसार प्रतिवर्षी शैक्षणिक वर्षापुरती तात्पुरती भरली जात आहेत. त्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी देखील सोबत प्रमाणे भरलेली आहेत.

व्यवस्थापन परिषद बैठक दि.२० जुलै, २०१२ ठराव क्र.७ नुसार माहे वेतनाचा तपशिल खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | पदाचे नाव | माहे वेतन |
|---|---|---|
| १. | प्राध्यापक | रु. ३०,०००/- |
| २. | सहयोगी प्राध्यापक | रु. २०,०००/- |
| ३. | सहाय्यक प्राध्यापक (विद्यापीठ अनुदान आयोग/अखिल भरतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अर्हतेप्रमाणे ) | रु. २०,०००/- |
| ४. | सहाय्यक प्राध्यापक (विद्यापीठ अनुदान आयोग/अखिल भरतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अर्हतेनुसार नसलेले) | रु. ८,४००/- |
| ५. | सहाय्यक प्राध्यापक (MCA Qualification धारण करीत असलेल्या उमेदवारासाठी) | रु. १२,०००/- |

उक्तप्रमाणे दरमहा वेतन देण्यात येत आहे. परंतू मा. संचालक सर्व शिक्षण संकुले यांच्यामार्फत NET / SET / Ph.D पात्रताधारक व MCA पात्र शिक्षकांना दरमहा एकत्रित वेतन रु.१५०००/- व पात्रताधारक नसलेले (NET / SET / Ph.D नसलेले) शिक्षकांना दरमहा एकत्रित वेतन रु.१२०००/- देण्यात यावे असे मागणी होत आहे.

उक्तबाब अवलोकनी घेता, विविध संकुलात शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून कंत्राटी / अभ्यागत पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या शिक्षकांना सुधारित वेतनवाढ करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव: NET / SET / Ph.D., MCA पात्रताधारक शिक्षकांना दरमहा एकत्रित वेतन ₹१२,०००/- वरुन ₹१५,०००/- इतकी वाढ व NET / SET / Ph.D., MCA पात्रताधारक नसणाऱ्या शिक्षकांना दरमहा एकत्रित वेतन ₹८,४००/- वरुन**

₹१२,०००/- इतकी वाढ करण्यास मान्यता देण्यात आली.

**[२६(४)] विद्यापीठाकडील अनामत रक्कमा परत करण्याबाबतचा नियमावलीचा प्रस्ताव विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाकडे विविध संकुलाकडे विद्यार्थी प्रवेश घेते वेळी त्यांच्याकडून प्रयोगशाळा व ग्रंथालय अनामत (Deposit) घेतली जाते. संबंधित विद्यार्थ्यांचा कोर्स पूर्ण झाल्यानंतर अथवा विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यास त्यांनी भरलेली अनामत रक्कम कोर्स पूर्ण झाल्यानंतर अथवा प्रवेश रद्द केल्यानंतर किती दिवसात मागणी केल्यास त्यांची अनामत रक्कम परत करता येईल याबाबत या विद्यापीठाने असा नियम न केल्याने अनामत रक्कम परत करताना प्रशासकीय कामात / लेखापरिक्षणाच्या दृष्टीने अडचण निर्माण होत आहेत. याबाबत महालेखाकार यांनी सन २००८-०९ ते २००९-१० च्या लेखापरिक्षणामध्ये परिच्छेद घेतला असून तीन वर्षापेक्षा जास्त प्रलंबित असणारे प्रयोगशाळा व गंथालय अनामतच्या रक्कमा सर्वसाधारण निधीमध्ये वर्ग करण्याबाबत सुचनाही दिल्या आहेत. त्यानुसार परिच्छेद वगळण्यासाठी नियमावली तयार करणे आवश्यक आहे.

सबब, त्या अनुषंगाने नियमावली समान लेखा संहिता (Common Account Code) मधील Chapter - I मध्ये General Principles त्यामधील १.४४(e) & (f) नुसार अनामत रक्कमे संदर्भात खालील अधिकार देण्यात आलेले आहेत. सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

| | |
|---|---|
| १) | A Claim of Rs.२,५००/- or less shall be laped after the expiry of १२ months from its becoming due. |
| २) | A claim exceeding Rs.२,५००/- shall be laped after the expiry of six years from its becoming due. |
| ३) | All above lapsed amounts shall be credited to university funds as a Miscellaneous Receipt. |

सबब, उपरोक्त नुसार अनामत रक्कम परत करण्याबाबत नियमावलीचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : विद्यापीठाकडील अनामत रक्कमा परत करण्यासंदर्भात नियमावली समान लेखा संहिता (Common Account Code) बाबतचा प्रस्ताव स्विकारुन मान्यता देण्यात आली.**

## [२६(५)] संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले सन २०११-१२ चे स्थानिक व्यवस्थापन समितीचे अहवाल म.वि.कायदा १९९४ कलम ८५ (५) (i) अन्वये विचारार्थ.

### स्थानिक व्यवस्थापन समिती अहवाल प्राप्त महाविद्यालये

| अ.क | महाविद्यालयाचे नाव | अ.क्र | **महाविद्यालयाचे नाव** |
|---|---|---|---|
| १. | **ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर. २१३, साखर पेठ (अशिकाल मैदान), पोस्ट बॉक्स नं. ५१०, सोलापूर. ४१३ ००५** | २. | भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशल वर्क, १६३ अ, रेल्वेलाईन, जुना एम्प्लॉमेंट चौक, सोलापूर. ४१३ ००१ |
| ३. | छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स, **मुरारजी पेठ, सोलापूर. ४१३ ००१.** | ४. | कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, सर्व्हे नं. ६३/१अ, एफपी नं.३४, उजनी कॉलनी, टी. व्ही. टॉवरच्या पाठीमागे, कुमठा नाका, सोलापूर. ४१३ ००३ |
| ५. | **श्री.वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय,** एम.आय.डी.सी., अक्कलकोट रोड, सोलापूर. ४१३ ००६ | ६. | **व्ही. जी. शिवदारे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,** कॉलेज ऑफ फॉर्मसी कॅम्पस, जुळे सोलापूर १, विजापूर रोड, सोलापूर. ४१३ ००७ |
| ७. | **वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स,** सेठ वालचंद हिराचंद मार्ग, अशोक चौक, सोलापूर. ४१३ ००६ | ८. | **वालचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी,** सेठ वालचंद हिराचंद मार्ग, अशोक चौक, पोस्ट बॉक्स नं. ६३४, सोलापूर. ४१३ ००६ |
| ९. | **वसुंधरा आर्टस् कॉलेज,** म्हाडा प्लॉट नं. २२, डी.फॉर्मसी कॉलेज जवळ, जुळे सोलापूर, सोलापूर. ४१३ ००४ | १०. | **देशभक्त हरिनारायण बंकटलाल सोनी कॉलेज,** १०५/२ ब, वैष्णवी नगर जवळ, विजापूर रोड,सोलापूर. ४१३ ००४ |
| ११. | **सोलापूर सोशल असोसिएशनचे, कॉलेज ऑफ एज्युकेशन,** सि.स.क्र. १०६५९, सिध्देश्वर पेठ, सोलापूर. ४१३ ००५ | १२. | डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स, दयानंद नगर, रविवार पेठ, सोलापूर. ४१३ ००२ |
| १३. | डी.ए.व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, दयानंद नगर, रविवार पेठ, सोलापूर. ४१३ ००२ | १४. | कॉलेज ऑफ फार्मसी, १ जुळे सोलापूर, विजापूर रोड, सोलापूर. ४१३ ००४ |
| १५. | डी.पी.बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, दयानंद नगर, रविवार पेठ, सोलापूर. ४१३ ००२ | १६. | डी. जी. बी. दयानंद लॉ कॉलेज, दयानंद नगर, रविवार पेठ, सोलापूर. ४१३ ००२ |
| १७. | संगमेश्वर कॉलेज, सात रस्ता सोलापूर. ४१३ ००१ | १८. | लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सम्राट चौक, सोलापूर. ४१३ ००२ |
| १९. | नागेश करजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, गट नं. १६ सोलापूर, तुळजापूर रोड, तळे हिप्परगा, सोलापूर. ४१३ ००२ | २०. | ब्रम्हदेवदादा माने इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, गेट नं. १३७, बेलाटी. ता.उ.सोलापूर, जि.सोलापूर. ४१३ २२४ |
| २१. | सी.बी.खेडगीज बसवेश्वर, राजा विजयसिंह कॉमर्स, राजा जयसिंह आर्टस कॉलेज, अक्कलकोट. ता.अक्कलकोट, जि. सोलापूर. ४१३ २१६ | २२. | संतोष भिमराव पाटील आर्टस, सायन्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज, मंद्रुप. ता.द.सोलापूर, जि.सोलापूर. ४१३ २२१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २३. | बी.बी.ए. व बी.सी.ए. महाविद्यालय, शिवगीरी जेऊर रोड, अक्कलकोट. ता.अक्कलकोट, जि.सोलापूर. ४१३ २१६ | २४. | मातोश्री लक्ष्मीबाई म्हेत्रे कॉलेज ऑफ एज्युकेशन, अक्कलकोट. ता.अक्कलकोट, जि. सोलापूर. ४१३ २१६ |
| २५. | कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी. ता.बार्शी, जि.सोलापूर. ४१३ ४११ | २६. | बी.पी.सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी. ता.बार्शी, जि.सोलापूर. ४१३ ४११ |
| २७. | राजर्षि शाहू लॉ कॉलेज, बार्शी. ता.बार्शी, जि.सोलापूर. ४१३ ४११ | २८. | जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वैराग. ता.बार्शी, जि.सोलापूर. ४१३ ४०२ |
| २९. | जय जगदंबा एम.एड. महाविद्यालय, वैराग. ता.बार्शी, जि.सोलापूर. ४१३ ४०२ | ३०. | सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग. ता.बार्शी, जि.सोलापूर. ४१३ ४०२ |
| ३१. | भारत महाविद्यालय, जेऊर (म.रेल्वे), ता.करमाळा. जि.सोलापूर. ४१३ २०२ | ३२. | श्री. सचिन टी. पाटील शिक्षणशास्त्र महाविद्यालय, रुई. ता.बार्शी जि.सोलापूर. ४१३ ४११ |
| ३३. | डॉ.पी.डी.पाटील कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड मॅनेजमेंट स्टडीज, झरे. ता.करमाळा, जि.सोलापूर. ४१३ २०३ | ३४. | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा. ता.करमाळा, जि.सोलापूर. ४१३ २०३ |
| ३५. | **ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲन्ड टेक्नॉलॉजी, शंकरनगर अकलूज.** ता.माळशिरस, जि.सोलापूर. ४१३ ११८ | ३६. | अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय, वेळापूर. ता.माळशिरस, जि.सोलापूर. ४१३ ११३ |
| ३७. | **राजसिंह मोहिते पाटील इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, शंकरनगर अकलूज,** ता.माळशिरस, जि.सोलापूर. ४१३ ११८ | ३८. | **श्रीराम इन्स्टिटयुट ऑफ इन्फरमेशन टेक्नॉलॉजी, पानीव - अकलूज.** ता.माळशिरस, जि.सोलापूर. ४१३ ११३ |
| ३९. | शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज. ता.माळशिरस, जि.सोलापूर. ४१३ १०१ | ४०. | श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा. ता.मंगळवेढा, जि.सोलापूर. ४१३ ३०५ |
| ४१. | पार्वती ताड शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मंगळवेढा. ता.मंगळवेढा, जि.सोलापूर. | ४२. | मदनसिंह मोहिते पाटील विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा. ता.मंगळवेढा, जि.सोलापूर. ४१३ ३०५ |
| ४३. | मा. बाबुराव पाटील कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, अनगर. ता.मोहोळ, जि.सोलापूर. ४१३ २१४ | ४४. | देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मंद्रुप हायवे नं. १४९ मोहोळ. ता. मोहोळ, जि.सोलापूर. ४१३ २१३ |
| ४५. | आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, माढा. ता.माढा, जि.सोलापूर. ४१३ २०९ | ४६. | के.एन.भिसे आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, कुर्डूवाडी. ता.माढा, जि.सोलापूर. ४१३ २०८ |
| ४७. | विठ्ठलराव शिंदे आर्टस कॉलेज, टेंभूर्णी. ता.माढा, जि.सोलापूर. ४१३ २११ | ४८. | बबनरावजी शिंदे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मोडनिंब. ता.माढा, जि.सोलापूर. ४१३ ३०१ |
| ४९. | शिक्षणशास्त्र महाविद्यालय, माढा. माढा-शेटफळ रोड, माढा. ता.माढा, जि.सोलापूर. ४१३ २०९ | ५०. | कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, गोपाळपूर, पंढरपूर. गोपाळपूर-रांजणी रोड, गोपाळपूर. पो.बॉ.नं.५४. ता.पंढरपूर, जि.सोलापूर. ४१३ ३०४ |
| ५१. | कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर. ता.पंढरपूर, जि.सोलापूर. ४१३ ३०४ | ५२. | उमा महाविद्यालय, पंढरपूर. ता.पंढरपूर, जि.सोलापूर. ४१३ ३०४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५३. | कर्मवीर औदुंबर पाटील विधी महाविद्यालय, पंढरपूर. जुना कराड नाका, पंढरपूर. ता.पंढरपूर, जि.सोलापूर. | ५४. | श्री. विठ्ठल एज्युकेशन अॅन्ड रिसर्च इन्स्टिटयुटचे, कॉलेज ऑफ फॉर्मसी, गोपाळपूर - रांजनी रोड पो.बॉ.नं.-५४, गोपाळपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर. |
| ५५. | बळीरामदादा बनसोडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चळे. ता.पंढरपूर, जि.सोलापूर. | ५६. | उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पंढरपूर. ता.पंढरपूर, जि.सोलापूर. ४१३ ३०४ |
| ५७. | श्री.विठ्ठल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वेणुनगर (गुरसाळे). ता.पंढरपूर, जि.सोलापूर. ४१३ ३०४ | ५८. | श्री.विठ्ठल एम.एड. महाविद्यालय, वेणुनगर (गुरसाळे). ता.पंढरपूर, जि.सोलापूर. ४१३ ३०४ |
| ५९. | कर्मयोगी अभियांत्रिकी महाविद्यालय, शेळवे. ता.पंढरपूर, जि.सोलापूर. ४१३ ३०४ | ६०. | न्यु सातारा कॉलेज ऑफ बी.सी.ए. पंढरपूर, नवीन सोलापूर रोड, रिलायन्स पेट्रोल पंपासमोर, पंढरपूर. ता.पंढरपूर, जि.सोलापूर. ४१३ ३०४ |
| ६१. | एस.के.एन. सिंहगड बिझनेस स्कूल, कोर्टी. ता.पंढरपूर, जि.सोलापूर. ४१३ ३०४ | ६२. | **न्यु सातारा कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, कोर्टी.** ता.पंढरपूर, जि.सोलापूर. ४१३ ३०४ |
| ६३. | कै. आमदार काकासाहेब साळुंखे -पाटील आर्टस अॅन्ड सायन्स कॉलेज, जवळे. ता.सांगोला, जि.सोलापूर. | ६४. | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ कॉम्प्युटर सायन्सेस, कोर्टी. ता.पंढरपूर, जि.सोलापूर. ४१३ ३०४ |
| ६५. | विज्ञान महाविद्यालय, सांगोला ता.सांगोला, जि.सोलापूर. ४१३ ३०७ | ६६. | सांगोला कॉलेज, सांगोला ता.सांगोला, जि.सोलापूर. ४१३ ३०७ |
| ६७. | सहयाद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे. ता.सांगोला, जि.सोलापूर. ४१३ ३०७ | ६८. | श्रीमती. काशीबाई नवले कॉलेज ऑफ एज्युकेशन, कमलापूर. ता.सांगोला, जि.सोलापूर. ४१३ ३०७ |
| ६९. | महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सांगोला. वासुद रोड, ता.सांगोला, जि.सोलापूर. ४१३ ३०७ | ७०. | माणदेश महाविद्यालय, जुनोनी. ता.सांगोला, जि.सोलापूर |
| ७१. | फॅबटेक टेक्निकल कॅम्पस्, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड रिसर्च, सांगोला. पो.बॉ.नं. ०४, पंढरपूर रोड, गेट नं. ५६५/१, सांगोला. ता.सांगोला, जि.सोलापूर. ४१३ ३०७ | | |

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८५ (५) (i) मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

**Prepare the annual report on the work done by committee for the year ending on the 30th June and submit the same to the management, the Management Council of the University and to the concerned Director.**

**ठरावः संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या सन २०११-१२ च्या स्थानिक व्यवस्थापन समितीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[२६(६)] "विद्यापीठ परिसरात मा. कुलगुरु महोदय निवासस्थानचे बांधकाम करणे" या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी - विद्यापीठ परिसरात मा. कुलगुरु महोदय निवासस्थानचे बांधकाम करणे आवश्यक आहे. त्यानुसार रु. २४,००,०००/-चे ढोबळ अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात आलेले आहे. त्यानुसार यापूर्वी मा. कुलगुरु महोदय यांनी बांधकाम समितीच्या वतीने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

सबब, "विद्यापीठ परिसरात मा. कुलगुरु महोदय निवासस्थानचे बांधकाम करणे" या कामाच्या अंदाजपत्रकीय एकूण रक्कम रु.२४,००,०००/- इतक्या खर्चास प्रशासकीय मंजुरीची बाब विचारार्थ).

**ठरावः "विद्यापीठ परिसरात मा. कुलगुरु महोदय निवासस्थानचे बांधकाम करणे" या कामाच्या अंदाजपत्रकीय तरतूद रु.२४ लक्ष यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.**

**[२६(७)] सन २००८-०९ व २००९-१० या आर्थिक वर्षाच्या लेखा परीक्षणावेळी (जुलै/ऑगस्ट २०११) मा. महालेखाकार यांनी खाजगी मनुष्यबळ पुरवठादार यांना चार वेळा मुदतवाढ दिलेल्या कारणास्तव लेखापरिक्षण अहवाल २००८-०९ व २००९-१० मध्ये आक्षेप Para No. 6 अन्वये नमूद केलेला आहे.**

(टिपणीः विद्यापीठास रोजंदारी मनुष्यबळ आवश्यक असल्याने, मे. वर्षा विजग्राहक सर्व सेवा स्वयंरोजगार सह.संस्था सोलापूर या संस्थेस विहीत प्रक्रियेद्वारे दि. १ जानेवारी २००९ ते दि. ३० नोव्हेंबर २००९ या ११ महिन्याच्या कालावधीसाठी खाजगी रोजंदारी मनुष्यबळ पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेले होते. सदर संस्थेने खालीलप्रमाणे विद्यापीठास मनुष्यबळ पुरवठा केलेला आहे.

| अ. क्र. | मनुष्यबळ पुरवठादार संस्था | करार कालावधी / मुदतवाढ कालावधी | कालावधी | नियुक्ती प्रक्रिया | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे.वर्षा विजग्राहक सर्व सेवा स्वयंरोजगार सह. संस्था मर्या.डी.१३७, न्यु संतोष नगर, विजापूर रोड, सोलापूर. | १/१/२००९ते ३०/११/२००९<br>७/१२/२००९ते २८/०२/२०१०<br>१/३/२०१० ते ३१/५/२०१०<br>१६/६/२०१० ते १५/८/२०१०<br>१९/८/२०१० ते ३१/८/२०१० | ११ महिने<br>०३ महिने<br>०३ महिने<br>०२ महिने<br>१३ दिवस | विहीत प्रक्रियेद्वारे<br>मुदतवाढ<br>मुदतवाढ<br>मुदतवाढ<br>मुदतवाढ | --<br>भरती प्रक्रियेमुळे मुदतवाढ |

विहीत प्रक्रिया न राबविता सदर संस्थेस (७/१२/२००९ ते ३१/०८/२०१०) एकूण ४ वेळा मुदतवाढ दिल्याने, प्रतिमहा प्रति कर्मचारी रु.२३०/- सेवाशुल्क दर मे. वर्षा विजग्राहक सर्व सेवा स्वयंरोजगार सह.संस्था सोलापूर या संस्थेस विद्यापीठामार्फत देण्यात आलेला आहे. यानंतर दि.०१/०९/२०१० मे. आयडियल एन्टरप्रायझेस या संस्थेने प्रतिमहा प्रति कर्मचारी सेवाशुल्क रु.७९/- या दराने मनुष्यबळ पुरवठा करण्याचे मान्य केले.

यास्तव मा. महालेखाकार यांनी रु.७९/- व रु.२३०/- या सेवाशुल्क दरातील फरकानुसार दि.७/१२/२००९ ते दि.३०/८/२०१० या कालावधीतील सेवाशुल्क रक्कम रु.१,१८,८३७/- जादा गेल्याचे नमूद करुन, लेखापरिक्षण अहवालात आक्षेप नमुद केला आहे.

उक्तप्रमाणे तत्कालिन कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने सदर संस्थेस चारवेळा मुदतवाढ देवून मनुष्यबळ पुरविण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. याबाबत केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषद बैठक दि.१०/०३/२०१० विषय क्र.१८(३), दि.३०/०८/२०१० विषय क्र.२५ नुसार माहितीस्तव ठेवण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर बैठकीतील ठराव खालीलप्रमाणे-

| | |
|---|---|
| ठराव क्र.१८(३) | मा. कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |
| ठराव क्र.२५ | मा. कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

सबब, मा. महालेखाकार यांनी Para No. 6 नुसार लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेल्या आक्षेपाचे स्पष्टीकरण कळविण्यासाठी मे. वर्षा विजग्राहक सर्व सेवा स्वयंरोजगार सह.संस्था सोलापूर या संस्थेस मुदतवाढीच्या कालावधीत प्रशासकिय मान्यतेने सेवाशुल्क रु.२३०/- नुसार रु.१,१८,८३७/- जादा रक्कम अदा केलेली आहे. सदरबाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर).

---

**ठरावः मा. महालेखाकार यांनी Para No. 6 नुसार लेखापरिक्षण अहवालात नमूद केलेल्या आक्षेपाचे स्पष्टीकरण कळविण्यासाठी मे. वर्षा विजग्राहक सर्व सेवा स्वयंरोजगार सह.संस्था सोलापूर या संस्थेस मुदतवाढीच्या कालावधीत प्रशासकीय मान्यतेने सेवाशुल्क रु.२३०/- नुसार रु.१,१८,८३७/- जादा रक्कम अदा केलेली आहे. मुदतवाढीस तद्अनुषंगिक सेवाशुल्क रु.१,१८,८३७/- खर्चास पूर्वलक्षीप्रभावाने मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे प्र. कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**